cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३१३ | शुक्रवार, दि.७ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

वाचाळवीरांना वेळीच रोखा!

सध्या महाराष्ट्रात वाचाळवीरांचे अमाप पीक माजले आहे. ही पैदास वेळीच ठेचली गेली नाही तर राज्यात अराजक माजेल. आजकाल कोणीही सोम्यागोम्या उठतो आणि महापुरुषांबाबत अर्वाच्य बोलतो. आपल्या विधानामुळे काय रण माजेल याची त्याला तमा नसते किंबहुना रण माजावे अशीच त्याची इच्छा असते. मग ते राहुल सोलापूरकर असोत, प्रशांत कोरटकर असोत, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड असोत, एमआयएमचे नेते ओवेसी असोत वा समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी असोत. या सा–या विषवल्ली आहेत. त्यांना वेळीच ठेचायला हवे.

'जिओस्टार'मध्येही टाळेबंदी १,१०० कर्मचाऱ्यांवर गंडांतर

मुंबई : इन्फोसिसमध्ये नुकतेच ३००० पेक्षा जास्त फ्रेशर्सना कामावरुन काढून टाकले होते. याआधी फेसबुक, ऍमेझॉन, फ्लिपकार्ट, ओला या दिग्गज कंपन्यांनीही नोकर कपातीची घोषणा केली. आता मुकेश अंबानी यांच्या मालकीची जिओस्टारही टाळेबंदीच्या तयारीत आहे. जिओस्टार १,१०० हून अधिक कर्मचा–यांना कामावरून काढून टाकणार आहे. वायकॉम १८ आणि डिस्ने स्टार इंडिया यांचे विलीनीकरण झाले. जिओस्टार आता देशातील सर्वात मोठी मीडिया कंपनी बनली आहे. अहवालानुसार, ऑपरेशन मजबूत करणे आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी ही टाळेबंदी केली जात आहे. रिलायन्स–डिस्ने विलीनीकरणाने भारतातील सर्वात मोठी मीडिया कंपनी तयार झाली असून ज्याचे मूल्य ७०,३५२ कोटी रुपये आहे.

डॉ.बाबासाहेब आंबडेकर कृषी स्वालंबन योजनेच्या नियमात बदल करण्यास कृषिमंत्र्यांचा स्पष्ट नकार

नगरपालिका आणि महानगरपालिका शेत्रातील शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार

मुंबई । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजनेत नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा राज्य सरकारचा कोणताही विचार नसल्याचं सांगत राज्याच्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी योजनेत बदलासाठी स्पष्ट नकार दिला आहे. यासंदर्भात सांगोल्याचे आ. बाबासाहेब देशमुख यांनी गुरुवारी (ता.६) प्रश्न विधीमंडळात उपस्थित केला होता. त्यावर कृषिमंत्री कोकाटे यांनी उत्तर दिलं. त्यामुळे नगरपालिका आणि महानगरपालिकेतील पात्र शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजनेतून अनुसूचित जाती आणि जमातीतील शेतकऱ्यांना विविध कामांसाठी अनुदान सरकार देतं. यामध्ये विहीर खोदणे, विहीर दुरुस्ती, सौर कृषीपंप आदि घटकांचा समावेश आहे. परंतु या योजनेच्या नियमानुसार नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या क्षेत्रातील शेतकरी या योजनेला अपात्र आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांसाठी योजनेच्या नियमात बदल करण्याची मागणी करण्यात येत आहे. आ. बाबासाहेब देशमुख यांनी देखील याच मागणीसाठी प्रश्न उपस्थित केला. यावेळी देशमुख म्हणाले, ''नगरपालिका आणि महानगरपालिकेचं क्षेत्र वाढवल्याने ग्रामपंचायतीचा समावेश या क्षेत्रात झाला. परंतु या क्षेत्रातील शेतकऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजनेचा लाभ देण्यासाठी योजनेच्या नियमात बदल करणार का,'' असा प्रश्न देशमुख यांनी उपस्थित केला. परंतु यावर कोकाटे यांनी नकार दिला. कोकाटे म्हणाले, ''पूर्वी या योजनेतून विहिरीसाठी अडीच लाख रुपये अनुदान दिलं जात होतं. आता ◀◀ पान २ वर

धान उत्पादक शेतकऱ्यांना १० हजार रुपये अनुदान द्या–सुधीर मुंगटीवार

मुंबई । प्रतिनिधी

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत देता मग धान उत्पादकांना का नाही, प्रस्ताव नाकाणारे अधिकाऱ्यांमधील आधुनिक वाल्मीक कराड कोण आहे, याचा शोध घ्या असं म्हणत आमदार सुधीर मुंगटीवार यांनी गुरुवारी (ता.६) सरकारवर जोरदार टिकास्त्र चालवलं. त्यावर राज्याचे मदत आणि पुनवर्सन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय घेऊ आणि धान उत्पादकांना मदत देण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही दिली. यावेळी राज्य सरकारच्या कारभारावर मुंगटीवार यांनी जोरदार टिका केली. त्यामुळे सरकारच्या कारभारातील सावळागोंधळ चर्चेचा विषय ठरला.

लष्करी अळीमुळे धान उत्पादक शेतकऱ्यांचं नुकसान झालं. परंतु पंचनामे न केल्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही. त्यावेळी निवडणूक होती. तसेच पिकाची काढणी झाली होती. राज्य सरकारला प्रस्ताव देऊनही अधिकाऱ्यांनी ते मंजूर केले नाहीत. त्यामुळे राज्य सरकार धान उत्पादकांना प्रति हेक्टरी १० हजार रुपये मदत देणार का, असा प्रश्न आमदार सुधीर मुंगटीवार ◀◀ पान २ वर

भय्याजी जोशी यांच्या वक्तव्यावरून विधिमंडळात गदारोळ

मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईत राहणा–याला मराठी भाषा आलीच पाहिजे असे काही नाही. या रा.स्व. संघाचे माजी सरकार्यवाह सुरेश उर्फ भय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्याला आक्षेप घेत विरोधकांनी आज विधिमंडळात सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. मुंबईचे तुकडे करण्याचे काम हा संघाचा छुपा अंजेडा आहे, मुंबई तोडून ती गुजरातमध्ये घेऊन जायची आहे, असा आरोप करत विरोधकांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे विधानपरिषदेचे कामकाज दोन वेळा तहकूब करावे लागले. तर विधानसभेत विरोधकांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर सत्ताधारी व विरोधी सदस्यांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा ही मराठीच आहे. राज्यातील प्रत्येकाने मराठी भाषा शिकलीच पाहिजे, असे ठणकावून सांगत या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या शेरेबाजीमुळे आदित्य ठाकरे आणि मंत्री नितेश राणे यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. सत्ताधारी व विरोधी सदस्यांमध्ये जोरदार वाद झाल्याने वातावरण स्फोटक झाले होते. अखेर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेचे कामकाज काही वेळासाठी तहकूब केल्यानंतर वातावरण निवळले. मुंबईच्या विद्याविहार येथील एका कार्यक्रमात संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांनी, मुंबईत विविध राज्य, प्रांत आणि भाषा बोलणारे नागरिक राहतात. मुंबईत अनेक भाषा आहेत, घाटकोपरची भाषा गुजराती आहे, त्यामुळे मुंबईत येणा–या प्रत्येकाला मराठी शिकले पाहिजे असे नाही असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याचे पडसाद विधिमंडळात उमटले. शिवसेनेच्या ठाकरे गटाने या मुद्यावरून फडणवीस सरकारला लक्ष्य केले आहे. विधानसभेत ठाकरे गटाच्या भास्कर जाधव यांनी हा विषय उपस्थित ◀◀ पान २ वर

भैय्याजी जोशींकडून स्पष्टीकरण

"माझ्या कालच्या बोलण्यामुळे काही गैरसमज होत आहेत. मी विविध भाषांच्या सह अस्तित्वावर बोलत होतो त्यामुळे मी स्वत: स्पष्ट करू इच्छितो की, मुंबई व महाराष्ट्राची भाषा मराठीच आहे व प्रत्येकाला मराठी भाषा शिकली पाहिजे असे स्पष्टीकरण भैयाजी जोशी यांनी कालच्या वक्तव्यावर उमटलेल्या पडसादानंतर केले आहे.

नाशिक परिमंडलातील ९ हजार ७२४ ग्राहक थकबाकीतून मुक्त

११ कोटी ३३ लाख रुपयांचा भरणा; अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

नाशिक । प्रतिनिधी

महावितरणने वीज कनेक्शन कायमस्वरूपी तोडलेल्या थकीत वीज बिल ग्राहकांसाठी अभय योजना जाहीर केली असून अभय योजना २०२४ नुसार थकबाकी एकरकमी भरल्यास थकबाकी वरील व्याज आणि विलंब आकारात सूट देण्यात येणार आहे. नाशिक परिमंडळात ९ हजार ७२४ ग्राहकांनी ११ कोटी ३३ लाख रुपयाचा भरणा करून थकबाकीतून कायमची मुक्ती मिळविली असून नवीन वीज जोडणी मिळण्यासाठी ते पात्र झाले आहेत. योजनेचा लाभ ३१ मार्च २०२५ पर्यंत

थकबाकी भरून घेता येणार आहे.

नाशिक मंडळात ४ हजार ४०२ ग्राहकांनी ४ कोटी ६७ लाख, मालेगांव मंडळात १ हजार ४०५ ग्राहकांनी १ कोटी २७ लाख आणि अहिल्यानगर मंडळात एकूण ३ हजार ९१७ ग्राहकांनी ५ कोटी ३८ लाख रुपयाचा ◀◀ पान २ वर

आर्थिक गुन्हे रोखण्यासाठी महाराष्ट्र इंटेलिजन्स युनिटची स्थापना - गृह राज्य मंत्री योगेश कदम

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात आर्थिक गुंतवणुकीच्या व्यवहारासाठी येणाऱ्या कंपन्या खऱ्या आहेत की फसव्या हे तपासण्यासाठी व भविष्यात टोरेस कंपनीसारखे आर्थिक गुन्हे होऊ नयेत यासाठी महाराष्ट्र इंटेलिजेन्स युनिटची स्थापना करण्यात येणार असल्याची माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना राज्यमंत्री श्री. कदम बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये सदस्य मनीषा कायंदे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला. टोरेस प्रकरणी पोलीस प्रशासन योग्य कार्यवाही करत असल्याचे सांगून राज्यमंत्री श्री. कदम म्हणाले, याप्रकरणी आतापर्यंत ७ जणांना अटक करण्यात आली असून १६ हजार ७८६ जणांची सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तर याप्रकरणी ४९ कोटी २ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. हे प्रकरण न्याय प्रविष्ठ असून न्यायालयाच्या निर्देशानुसार गुंतवणुकदारांचे पैसे परत ◀◀ पान २ वर

बीड एमआयडीसीबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी घेतली मंत्री ना.उदय सामंतांची भेट

बीड । प्रतिनिधी

बीडच्या एमआयडीचा विकास व्हावा याकरिता गेल्या अनेक दिवसांपासून आ.संदीप क्षीरसागर शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यातच गुरूवारी (दि.६) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधीमंडळात महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली.

बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा याकरिता बीड शहरात स्थित असलेल्या औद्योगिक वसाहतीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून त्याठिकाणी मोठमोठे उद्योग येतील आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल ◀◀ पान २ वर

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी शासन सकारात्मक–कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल

मुंबई । प्रतिनिधी

शासन नेहमीच शेतकऱ्यांच्या बाजूने असते, नुकसान भरपाई बाबत शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत केली जाते. शासन धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बाजूने असून राज्यात धान उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात येईल, असे कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

चंद्रपूर जिल्ह्यातील धान व कापूस या पिकावरील किडीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबतचा प्रश्न सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केला होता. ◀◀ पान २ वर

मुंबईतील धोकादायक आणि जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला गती देणार–उपमुख्यमंत्री शिंदे

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई शहरातील धोकादायक, जुन्या आणि मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या जलद पुनर्विकासासाठी लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेऊन इमारतींच्या पुनर्विकासातील अडथळे दूर करून या पुनर्विकासाला गती देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली. सदस्य अमिन पटेल यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, बृहन्मुंबई महानगरपालिकेने किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने इमारत धोकादायक घोषित ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: २६८.०० क्विंटल			
	२,४००	३,२२१	२,८०३
ज्वारी/हायब्रिड: २१३.५० क्विंटल			
	१,५३१	३,३२०	२,३८३
मका/लोकल:२०.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर :५८.०० क्विंटल			
	६,७००	७,२५०	७,१०३
उडीद : ७.५० क्विंटल			
	५,१००	५,१००	५,१००
बाजरी: २७.०० क्विंटल			
	२,०१०	३,०५१	२,७१२
मुग :४.५० क्विंटल			
	६,५०१	७,४५१	६,९७६
सोयाबीन: ३२.०० क्विंटल			
	३,९००	३,९५०	३,९२५
हरभरा: १५.०० क्विंटल			
	५,१००	५,२५०	५,१९५

कांद्याच्या शेतात कोपी टाकण्यास मज्जाव केल्यामुळे गोठा जाळला

आगीत एक गाय जळून भस्मसात तर दुसरीही भाजली; महिलेसही मारहाण

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील निमगाव येथे आपल्या कांद्याच्या शेतामध्ये कोपी टाकण्यास मज्जाव केल्याने रेणुका बळे या महीलेस मारहाण करत त्यांच्या गोठ्याला आग लावली. या आगीमध्ये वीस हजार रुपये किमतीची गाय होरपळून मृत्यू पावली तर दुसरी गाय ही भाजली यावेळी या महिलेला शिवीगाळ करत जीव मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्या. याप्रकरणी तिघांविरुद्ध चकलांबा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे .

शिरूर तालुक्यातील निमगाव येथे रेणुका संदीप बळे(वय ३०) ही महिला आपले पती, सासू–सासरे व मुलांसह निमगाव शिवारातील गट नंबर ४१० मध्ये राहते. ही जमीन या कुटुंबाला शासनाकडून देण्यात आली आहे. या जमिनीवर त्यांची उपजीविका चालते. दिनांक ५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता ही महिला घरात काम करत असताना शेजारी राहणारे दत्ता नामदेव शिंदे, गणेश नामदेव शिंदे व बारकाबाई नानासाहेब पवार या तिघांनी या महिलेच्या शेतात तील कांद्याच्या पिकात कोपी टाकण्यास सुरुवात केली. याला सदर महिलेने विरोध केला म्हणून दत्ता शिंदे यांनी या महिलेला शिवीगाळ करून लाथा बुक्क्याने मारहाण केली व जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्या. त्यानंतर दत्ता नामदेव शिंदे याने जनावरांचा गोठा पेटून दिला. या गोठ्यात दोन जरशा गाई होत्या गोठ्याला आग लागल्याने यात एक जर्सी गाय होरपळून मृत्युमुखी पडली. मात्र एक गाय सोडून बाहेर आणली .ही गाय यात बरीच होरपळली आहे. आग मोठी असल्याने सदर महिलेने ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

वाचाळवीरांना वेळीच रोखा!

सध्या महाराष्ट्रात वाचाळवीरांचे अमाप पीक माजले आहे. ही पैदास वेळीच ठेचली गेली नाही तर राज्यात अराजक माजेल. आजकाल कोणीही सोम्यागोम्या उठतो आणि महापुरुषांबाबत अर्वाच्य बोलतो. आपल्या विधानामुळे काय रण माजेल याची त्याला तमा नसते किंबहुना रण माजावे अशीच त्याची इच्छा असते. मग ते राहुल सोलापूरकर असोत, प्रशांत कोरटकर असोत, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड असोत, एमआयएमचे नेते ओवेसी असोत वा समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी असोत. या सा-या विषवल्ली आहेत. त्यांना वेळीच ठेचायला हवे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जिथे जिथे मराठी माणूस आहे तेथे त्यांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज हे वंदनीय आणि आदरणीय आहेत. पण कोणी तरी येतो आणि त्यांच्याबद्दल काहीतरी बरळून जातो. त्यामुळे विनाकारण समाजात दुहीची आणि द्वोषाची निर्मिती केली जाते. महापुरुषांची विटंबना असो अथवा महापुरुषांबाबत केलेली आक्षेपार्ह विधाने असोत त्यामुळे राज्यातच नव्हे तर देशात अनेक ठिकाणी गंभीर स्वरूपाच्या दंगलीसुद्धा झाल्या आहेत. त्यामुळे सामाजिक वातावरण बिघडण्यास मदतच झाली.

गत काही दिवसांपूर्वी राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकर यांनी जी काही विधाने केली ती करण्याची काहीच गरज नव्हती पण बोलण्याच्या भरात ते भरकटत गेले आणि आपण महापुरुषांचा अवमान करत आहोत याचे त्यांना भानच राहिले नाही. मुळात गत काही वर्षांत सर्वच महापुरुष आपापल्या जातीमध्ये दुर्दैवाने विभागले गेले आहेत. इतर जातीतील लोकांना या आपल्या महापुरुषांबद्दल आदर वाटत नाही अशा प्रकारची भावना निर्माण होत आहे अथवा जाणीवपूर्वक निर्माण करण्याचा प्रयत्नही होत आहे. काही दिवसांपूर्वी अशा वाचाळवीरांमध्ये समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी सामील झाले. त्यांनी मुघल बादशहा औरंगजेब हा सर्वोत्कृष्ट प्रशासक होता आणि त्याच्या कारकीर्दीमध्ये सारे काही आलबेल होते अशा प्रकारचे विधान केले. औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न त्यांना चांगलाच भोवला आहे. आझमी यांनी दोन दिवसांपूर्वी विधान भवन परिसरात माध्यमांसमोर बोलताना औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. तो क्रूर शासक नव्हता असे गौरवोद्गार काढल्यानंतर राज्यभरातून आझमी यांच्या विरोधात संताप व्यक्त केला जात होता. त्याचे पडसाद विधिमंडळातही उमटले.

बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासानंतर संसदीय कामकाजमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आझमींच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांनी आवाजी मतदानाने आझमी यांच्या निलंबनाचा ठराव एकमताने मंजूर केला. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपेपर्यंत आझमी यांना निलंबित करण्यात आले आहे. निलंबन प्रस्तावावर बोलताना भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांनी मविआच्या काळात भाजपच्या एका विधान परिषद सदस्याने सैनिकांविषयी केलेल्या वक्तव्याचा दाखला देत, त्यावेळी जशी कारवाई करण्यात आली होती, त्याच पद्धतीने आझमींचे केवळ अधिवेशन काळापुरते निलंबन न करता पाच वर्षांसाठी सदस्यत्व रद्द करावे, त्यांचे सर्व भत्ते, आमदार निधी व पगारही बंद करण्यासाठी प्रस्तावात सुधारणा करण्याची आग्रहाची मागणी केली होती. छत्रपतींचा अवमान करणा-यांना सोडणार नाही असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. छत्रपतींचा अवमान करणा-यांना शंभर टक्के जेलमध्ये टाकू असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले, महापुरुषांचा अवमान केल्याचा आरोप असलेल्या प्रशांत कोरटकरने अटकपूर्व जामीन मिळवला आहे पण त्याविरोधात आम्ही उच्च न्यायालयात जाऊ, कोरटकर वगैरे चिल्लर माणसे आहेत, जितेंद्र आव्हाड काय बोलले त्याचा विरोधकांनी निषेध केला नाही. औरंगजेब होता म्हणून शिवाजी महाराजांना ओळखले जाते.

औरंगजेब किती बलाढ्य होता आणि शिवाजी महाराज पाच फुटांचे होते असे जितेंद्र आव्हाड म्हणाले होते. माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' मधून छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या लिखाणाचा निषेध करणार का? असा सवाल मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना केला. आपल्यावरील निलंबनाची कारवाई अन्याय करणारी आहे असे अबू आझमी यांनी म्हटले आहे. माझे निलंबन हा केवळ माझ्यावरच नव्हे तर मी ज्या लाखो लोकांचे प्रतिनिधित्व करतो, त्यांच्यावरही अन्याय आहे असे ते म्हणाले. सध्या 'छावा' चित्रपटाच्या निमित्ताने महाराष्ट्रात छत्रपती संभाजी महाराजांबद्दल जो आदरभाव वृद्धिंगत झाला आहे, त्याला धक्का देणारे वक्तव्य अबू आझमींनी केले आहे. संभाजी राजांवर अत्यंत क्रूर पद्धतीने अत्याचार करणा-या औरंगजेबाचे कोडकौतुक करणारे नेते महाराष्ट्रात आहेत ही अत्यंत लांच्छनास्पद गोष्ट म्हणावी लागेल. या आधीसुद्धा छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमचे नेते ओवेसी यांनी सभेमध्ये औरंगजेबाचे अशाच प्रकारे गुणगान केले होते. ज्या महापुरुषांबद्दल सा-यांच्या मनात आदरभाव आहे त्या महापुरुषांना गंभीर दुखापत करणारे औरंगजेबासारखे क्रूर बादशहा आदर्श कसे असू शकतात? महापुरुषांबाबत आक्षेपार्ह विधाने करणा-यांना योग्य शिक्षा देण्याची तयारी सरकारने ठेवली पाहिजे. विनाकारण एखाद्या समाजाबद्दल अविश्वासाची भावना निर्माण केली जात असेल तर त्यावर आता गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. कोणीतरी एकाने केलेल्या चुकीच्या विधानाचा फटका संपूर्ण समाजाला बसण्याचा धोकाही लक्षात घ्यायला हवा. असे विषय पेटणार नाहीत याचीही काळजी घ्यायला हवी. सामाजिक वातावरण बिघडवणा-यांवर, वाचाळवीरांवर कडक कारवाई करण्याची अत्यंत गरज आहे. अशा प्रकारच्या आक्षेपार्ह विधानामुळे त्या महापुरुषांचा अवमान तर होतोच शिवाय विनाकारण सामाजिक वातावरण बिघडते आणि अविश्वासाची भावना निर्माण होते हे अधिक गंभीर आहे. चांगला प्रशासक होण्यासाठी खूप चांगली कामे करावी लागतात पण क्रूर कामे करणारा कधीच चांगला प्रशासक होऊ शकत नाही. अबू आझमींना चांगल्या प्रशासकाबद्दलचे आपले मत बदलावे लागेल.

आ.लोणीकरांचा लक्षवेधी द्वारे विधिमंडळात आवाज

ज्ञानराधा मल्टीस्टेट मधील ठेवीदारांचे पैसे ठेवीदारांनी आत्महत्या केल्यानंतर देणार का?; आ.लोणीकर आक्रमक

जालना । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या जालना छत्रपती संभाजीनगर परभणी हिंगोली लातूर धाराशिव बीड यासह राज्यभरातील विविध शाखांमध्ये अनेक ठेवीदार व खातेदार यांनी अनेक वर्षापासून एफ.डी. स्वरूपात तसेच बचत खात्यावर सोने तारण स्वरूपात तसेच रोख रक्कम ठेवलेली आहे. परंतु ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या तथाकथित घोटाळ्या दरम्यान महाराष्ट्रभरातील सर्व शाखा एकाच वेळी बंद पडल्या असून सर्वसामान्य नागरिक मात्र यामुळे प्रचंड त्रस्त आहेत. या सर्व सर्वसामान्यांनी गोरगरीब नागरिकांचे अडकलेले पैसे सरकार परत कधी करणार असा सवाल आज विधिमंडळात आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला.

निविदारांनी ठेवीदारांनी आत्महत्या केल्यानंतर पैसे मिळणार का असे विचारला आमदार बबनराव लोणीकर येणे केली आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये लक्षवेधीच्या माध्यमातून आमदार बबनराव लोणीकर यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट या पतसंस्थेच्या संदर्भात सर्वसामान्य गोरगरीब लोकांच्या अडकलेल्या पैशाचा प्रश्न सरकार समोर उपस्थित केला. यासंदर्भात पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या वतीने २३% पेक्षा अधिक व्याज देण्याचे अमिष सर्वसामान्य लोकांना दाखवण्यात आले. व्यापारी, शेतकरी व शेतमजूर यांच्यासह सर्वसामान्य जनतेने मुलीच्या लग्नासाठी अथवा इतर महत्त्वपूर्ण बाबींसाठी रोख रक्कम वा सोने सदरील पतसंस्थेत ठेवले. मागील वर्षभरापासून महाराष्ट्रातील ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या सर्व शाखा बंद आहेत, या पतसंस्थेचे अध्यक्ष, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी ठेकेदार व खातेदारांचे पैसे वा सोने परत केलेले नाही. या पतसंस्थेच्या महाराष्ट्रातील सर्व शाखा बंद असल्यामुळे व अध्यक्षांसह संचालक मंडळाला अटक झालेली असल्यामुळे संबंधित गोरगरीब लोकांचा पतसंस्थेमध्ये ठेवण्यात आलेला ऐवज देण्यास टाळाटाळ केली जात आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या या कृतीमुळे बीड व जालना पोलिसांनी या प्रकरणात ठेवीदाराचे पैसे देण्यास कसूर केल्याबाबत गुन्हा नोंदवून ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या अध्यक्षासह इतरांना अटक करण्यात आली त्यामुळे सदरहू ठेवीदार व खातेदार आर्थिक संकटात सापडले असून याबाबत ठेकेदार व खातेदार यांना न्याय मिळवून देणेसंबंधी शासनाने योग्य ती कारवाई करणे अपेक्षित आहे. या घोटाळ्यात लाखो ठेवीदारांना कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. बीड, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, पुण्यातील शाखांमधून ईडीने सुमारे ९५ कोटींची संपत्ती जप्त केली आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटचे चेअरमन सुरेश कुटे यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त केली आहे. या मालमत्तेची किंमत १४३३ कोटी ४८ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी विधिमंडळात दिली. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेटचे जालना, छत्रपती संभाजी नगर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, बीड यासह राज्यात व राज्याबाहेर जाळे पसरलेले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सुरेश आणि अर्चना कुटे यांच्या मालकीच्या २३८ मालमत्ता आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, पतसंस्थेत ठेवीदार आणि बचत खातेदारांचे एकूण ३ हजार ७१५ कोटी ५८ लाख ७२ हजार ६३३ रुपये अडकले आहेत. तर ईडीने आजपर्यंत अंदाजे १४३३ कोटी ४८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. या प्रकरणा संदर्भात गंभीर दखल घेत महाराष्ट्र सरकार पुढे काय कायदेशीर पाऊल उचलणार आहे या संदर्भात सर्व ठेवीदार गोरगरीब लोकांचे लक्ष लागले आहे. शासनाने हा मुद्दा अत्यंत गांभीर्याने घेणे अपेक्षित असून असे झाले नाही तर सर्वसामान्य गोरगरीब ठेवीदाराला आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही या आत्महत्या वाचवायच्या असतील तर शासनाने वेळीच पाऊल उचलणं अपेक्षित आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी विधिमंडळात म्हणाले. यावेळी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, या सर्व पतसंस्था केंद्र सरकारच्या अधिकारात येतात परंतु असे असले तरी आमदार बबनराव लोणीकर यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळ्यासंदर्भात सविस्तर अभ्यास केलेला असून अत्यंत पोट तिडकीने वारंवार प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न मांडला आहे त्यामुळे आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य व केंद्र सरकार मध्ये समन्वय साधून यासंदर्भात लवकरात लवकर गोरगरिबांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहील त्याचप्रमाणे केंद्र सरकारचे एक कार्यालय पुणे या ठिकाणी उभारण्यासंदर्भात देखील प्रयत्न केले जातील. या संदर्भात आमदार प्रकाश सोळंके यांनी जी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे आहे ती सरकारकडे नाही काय? असा सवाल करत सरकारने याबाबत अत्यंत गांभीर्यपूर्वक भूमिका घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या घोटाळ्या संदर्भात व सर्वसामान्यांचे अडकलेल्या पैशासंदर्भात आपण प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रश्न मांडलेले असून केवळ प्रत्येक अधिवेशनात प्रश्न मांडायचा आणि शासनाने परत परत तेच ते उत्तर द्यायचे असे किती दिवस चालणार असा सवाल आमदार बबनराव लोणीकर यांनी सरकारला विचारला. जर शासनाने या संदर्भात ठोस भूमिका घेतली नाही तर सर्वसामान्य नागरिक त्यांच्या मुलीचे लग्न कसे करणार मुलांची फीस कशी भरणार असे अनेक गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहतील व शेवटी आत्महत्येचा पर्याय त्यांना स्वीकारावा लागेल याचा विचार करणे गरजेचे आहे.

राहुल गांधींनी दिली धारावी झोपडपट्टीला भेट

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी आज महाराष्ट्र दौ-यावर आले असून त्यांनी मुंबईतील धारावी झोपडपट्टीत भेट दिली. तत्पूर्वी काँग्रेस नेत्यांनी व खासदार वर्षा गायकवाड यांनी त्यांचं मुंबई विमानतळावर स्वागत केले. धारावीमधील नवउद्योजकांशी चर्चा केल्यानंतर ते अदानी उद्योग समुहाकडून होणा-या धारावी पुनर्विकास प्रकल्पाचाही आढावा घेणार आहेत.

त्यामुळे, राहुल गांधीचा हा दौरा महत्त्वाचा मानला जातो. धारावीमधील नवउद्योजकांशी चर्चा केल्यानंतर ते अदानी उद्योग समुहाकडून होणा-या धारावी पुनर्विकास प्रकल्पाचाही आढावा घेत आहेत. त्यामुळे, राहुल गांधीचा हा दौरा महत्त्वाचा मानला जातो. राहुल गांधींनी धारावीमधील चामर स्टुडिओला भेट देत येथील उत्पादन, कलाकारी, बॅग्जची पाहणी केली. धारावीतील सुधीर राजभर भारतातील लाखो दलित तरुणांच्या जीवनाचा आणि प्रवासाचा आढावा घेतला.

खेडगाव व रोहीलागड येथे पाणलोट रथ यात्रा संपन्न

अंबड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत केंद्र शासनाच्या भूसंसाधन विभाग व मृद व जलसंधारण विभाग व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुक्यात खेडगाव व रोहीलागड येथे पाणलोट रथ यात्रा उत्साहात संपन्न झाली. खेडगाव येथे केंद्र शासनाच्या मोबाईल व्हॅनचे आगमन झाले. यावेळी उपविभागीय जलसंधारण अधिकारी ऋतुजा देसाई व सरपंच शंकरराव गोडसे यांनी रथास हिरवी झेंडी दाखवून रथाचे स्वागत केले. यामध्ये शाळेतील विद्यार्थी, महिला बचत गट प्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकीत सिंग हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा जलसंधारण अधिकारी एस. एस. वाघमारे, सरपंच रामदास खांडेभराड, जलसंधारण अधिकारी उदय माठे, विठ्ठल ढोबळे, सुशील बिरादार, अश्विनी खुणे, वैष्णवी निलपल्ले, संबंधित ग्रामसेवक, तलाठी, कृषि सहाय्यक, मुख्याध्यापक, शिक्षक, वन विभाग, उमेद , जलसंपदा,आत्मा, कृषि या विभागाचे अधिकारी व गावातील युवक, शेतकरी,महिला बचत गट सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जलतज्ञ राधेशाम राजपूत यांनी पाणलोट संकल्पना या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहिलगड पाणलोट समिती सचिव सतीश होलगे, शिवनाथ ठोके, भारत शिरसाठ, प्रियंका चांदवडे, राजेंद्र लोंढे व पाणलोट समिती खेडगाव यांनी परिश्रम घेतले. यावेळी निबंध स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा,मधील विजेते व पाणलोट योध्या व धारिणीताई यांना सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकीत सिंग व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पाणलोट योजनेतून मंजूर असलेल्या सामूहिक शेततळे व फळबाग लागवड कामाचे भूमिपूजन करण्यात आले व योजनेतून पूर्ण झालेल्या सामुहिक शेततळ्याचे लोकार्पण करण्यात आले. श्रमदान व वृक्षारोपण यावेळी खेडगाव येथील शाळा परिसरात व रोहीलागड येथील वन परीक्षेत्रात श्रमदान करून वृक्षारोपण करण्यात आले. दरम्यान खेडगाव व रोहिलगड येथील उपस्थित ग्रामस्थ यांना मृद व जलसंवर्धनाची शपथ देण्यात आली.

अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य यांचा आज दौरा

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा) गोरक्ष लोखंडे हे दि.७ मार्च २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार दि.७ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत अंबड नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत घनसावंगी नगर नगरपंचायत मुख्याधिकारी यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत परतूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत मंठा नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. सोयीनुसार मंठा येथून वाहनाने पुणेकडे प्रयाण करतील.

पान १ वरून...

डॉ.बाबासाहेब आंबडेकर कृषी स्वालंबन

४ लाख रुपये अनुदान दिलं जातं. विहीर दुरुस्तीसाठी ५० ऐवजी १ लाख, विद्युत पंपच्या संचासाठी २० हजार ऐवजी ४० हजार देत आहोत. शेत अस्तरीकरण १ लाखावरून २ लाख केले आहेत. ठिंबक सिंचन संच ५० हजारांवरून ७० हजार केला आहे.'' असं कोकाटे म्हणाले. पुढे कोकाटे म्हणाले, ''तुषारसाठी अनुदान २५ हजारावरून ४७ हजार केलं आहे. नवीन घटकांचा समावेश केला आहे. परंतु राज्य सरकारच्या २४ एप्रिल २०१८ निर्णयानुसार नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांचा लाभ बंद करण्यात आला आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना लाभ देता येणार नाही. कारण जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या एनओसीचा प्रश्न येणार आहे. त्यामुळे या क्षेत्रातील लाभ देता येणार नाही.'' असं कोकाटे यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, आमदार अर्जुन खोतकर यांनी नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांचा या योजनेत समावेश करण्याची मागणी केली.

भय्याजी जोशी यांच्या वक्तव्यावरून

केला. मराठीला आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. मात्र रा.स्व.संघाच्या सुरेश उपाख्य भय्याजी जोशी यांनी घाटकोपर येथे संबोधन करताना घाटकोपरमध्ये गुजराती समाजाची संख्या जास्त आहे. त्यामुळे येथे गुजराती भाषा बोलली गेली तरी हरकत नाही असे विधान केले आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी त्यांनी केली. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी, भय्याजी जोशी नेमके काय म्हणाले हे मी ऐकलेले नाही. मात्र सरकारची भूमिका स्पष्ट असल्याचे सांगताना, मुंबई-महाराष्ट्राची भाषा ही मराठीच राहणार. महाराष्ट्रात राहणा-या प्रत्येकाने मराठी शिकली पाहिजे, बोलता आली पाहिजे असे ठणकावून सांगितले. त्याचवेळी आम्ही इतर भाषांचाही सन्मान करतो. ज्याचे आपल्या भाषेवर प्रेम असते तो इतरांच्या भाषेवरही प्रेम करतो असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आदित्य ठाकरे-नितेश राणे आमने सामने

फडणवीस यांनी केलेल्या स्पष्टीकरणावर भास्कर जाधव यांचे समाधान झाले होते. पण त्यांच्या पाठोपाठ आदित्य ठाकरे हे बोलायला उभे राहिले. मंत्री नितेश राणे आणि इतर भाजपा सदस्यांनी त्याला आक्षेप घेतला. मुख्यमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट केली असल्याने त्यावर आता अधिक बोलता येणार नाही, असे त्यांचे म्हणणे होते. यावरून खडाजंगी सुरू झाली. नितेश राणे आणि आदित्य ठाकरे यांच्यात चांगलीच चकमक उडाली. तेव्हा ठाकरेंच्या बचावार्थ वरूण सरदेसाईंसह इतर आमदार पुढे आले. तर नितेश राणे,आशिष शेलार,योगेश सागर हे देखील आक्रमक झाले होते. दोन्ही बाजूच्या सदस्यांकडून जोरदार गदारोळ सुरू झाला. अखेर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज पाच मिनिटांकरिता तहकूब केले.

विधानपरिषदेतही गदारोल

याच मुद्यावरून विधानपरिषदेतही जोरदार गदारोळ झाला. मुंबईचे तुकडे करण्याचा संघाचा छुपा अजेंडा आहे. केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन गौरवले. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून मराठी भाषेला कायमच दुय्यम दर्जाची वागणूक दिली गेली आहे. मराठी भाषेला डावलून संघाला तुकडे करायचे आहेत. मुंबईचे तुकडे करण्याचे काम हा संघाचा छुपा अंजेडा आहे, मुंबई तोडून ती गुजरातमध्ये घेऊन जायची आहे, असा हल्ला शिवसेनेचे ठाकरे गटाचे अनिल परब यांनी केला. मराठीचा अपमान करणा-या जोशींवर सरकारने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करत महाविकास आघाडीच्या आमदारांनी कामकाज रोखून धरले. या गदारोळामुळे सभापतींनी दोनवेळा सभागृहाचे कामकाज तहकूब केले. मुंबईतील उद्योग तर गुजरातला पळवले आहेतच. आता मुंबईचे तुकडे पाडून त्यांची भाषा गुजराती करण्याचा कट रचला जात आहे,असा आरोप करत विरोधकांनी घोषणाबाजी केली. शिवरायांबद्दल बोलणा-यांवर कारवाई केली त्याप्रमाणे जोशींवरही गुन्हा दाखल करावा, अशी मागणी काँग्रेसच्या भाई जगताप यांनी केली. विरोधकांच्या टिकेला उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर जोशी यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, जोशी यांच्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला. पण महाराष्ट्रात राहणा-या प्रत्येकाला मराठी आलीच पाहिजे. त्याबाबत शासनाची कुठलीही भूमिका वेगळी नाही, असे स्पष्ट केले. विरोधकांनी सरकारच्या निषेधार्थघोषणा देत सभात्याग केला.

राजद्रोहाचा खटला भरा : उद्धव ठाकरे

उद्धव ठाकरे यांनी भैय्याजी जोशी यांच्या वक्तव्यावर टीका करताना, त्यांनी तामिळनाडू आणि गुजरातमध्ये जाऊन असं व्यक्तव्य करुन दाखवावे, असे आव्हान दिले. सरकारने त्यांच्यावर कारवाई करावी, राजद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही उद्धव ठाकरेंनी केली. पूर्वी भाषावार प्रांतरचना झाली, आता गल्लीवार प्रांत रचना करत आहात का? शिवरायांचा अवमान करणारा प्रशांत कोरटकर चिल्लर माणूस आहे असे मुख्यमंत्री म्हणाले. आता भैय्याची जोशी सुद्धा चिल्लर माणूस आहे असे जाहीर करा किंवा त्यांच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली.

बीड एमआयडीसीबाबत आ.संदीप क्षीरसागर

तसेच आर्थिक स्थिती सुधारेल. ही बाब लक्षात घेऊन आ.संदी प क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून बीडच्या एमाआयडीसीच्या विकासासाठी पाठपुरावा करत आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली होती. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक अधिकारी आदी वरिष्ठ अधिकार्यांसमवेतही बैठका घेतल्या होत्या. आता पुन्हा यासंदर्भात, मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली आहे. दरम्यान याविषयी ना.सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच सविस्तर बैठक लावण्याचे सांगितले आहे.

आर्थिक गुन्हे रोखण्यासाठी महाराष्ट्र इंटेलिजन्स

करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. या हस्तगत केलेल्या मुद्देमालाचा लिलाव करण्यात येतो आणि त्यातून विहित नियमांनुसार गुंतवणुकदारांना पैसे परत केले जातात. त्यानुसार आर्थिक गुन्हे कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे. उर्वरीत वसुलीसाठी कंपनीच्या सर्व मालमत्ता जप्त करण्यात येतील. तसेच या मालमत्तांमधूनही वसुली न झाल्यास कंपनी संचालकांच्या इतर ठिकाणी असलेल्या मालमत्तांवर कारवाई करण्यात येईल. याप्रकरणी शासन कडक कारवाई करेल अशी माहिती राज्यमंत्री श्री. कदम यांनी दिली.

नाशिक परिमंडलातील ९ हजार

भरणा केला आहे. अशाप्रकारे नाशिक परिमंडळात एकूण ९ हजार ७२४ ग्राहकांनी ११ कोटी ३३ लाख रुपयाचा भरणा करून थकबाकीतून कायमची मुक्ती मिळविली आहे. ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ही ही योजना आहे. थकित बिलांच्या योजनेत कृषी ग्राहकांचा समावेश नाही. या योजनेत वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी थकित बिलाच्या मूळ रकमेवरील व्याज आणि विलंब आकाराच्या स्वरुपातील दंड माफ करण्यात येणार आहे. वीजबिलाचा वाद न्यायप्रविष्ट असलेल्या पीडी ग्राहकांनाही या योजनेचा काही अटी व शर्तीवर लाभ घेता येईल. मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरायची सवलत ग्राहकांना मिळेल. जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एक रकमी थकित बिल भरतील त्यांना दहा टक्के सवलत देण्यात येईल. उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत मिळेल. महावितरणच्या मोबाईल ऍपवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीज ग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर फोन करून आणि महावितरण कार्यालयात संपर्क करून ही माहिती घेऊ शकतात.

धान उत्पादक शेतकऱ्यांना १० हजार

यांनी उपस्थित केला. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी टोलवाटोलवीचं उत्तर दिलं. त्यावरून सुधीर मुंगटीवार यांनी ज्येष्ठ आमदार म्हणून एक सल्ला देतो म्हणत जयस्वाल यांना सचिवांची उत्तर देऊ नका, असा टोला लगावला. त्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांच्या अनुदानावरून विधिमंडळात आमदार आणि मंत्र्यांमध्ये खडाजंगी झाल्याचं पाहायला मिळालं. चंद्रपुर जिल्ह्यात धान उत्पादक शेतकऱ्यांचं ३७ हजार हेक्टरवर लष्करी अळीनं नुकसान झालं. त्यामुळे १७ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्य सरकारला प्रस्ताव पाठवण्यात आले. परंतु त्यावेळी निवडणूक होती. त्यामुळे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले नाहीत. मात्र विभागीय आयुक्तांकडून प्रस्ताव पाठवल्यानंतरही मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी ते नाकारले. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही. आता १० हजार रुपये प्रति हेक्टरी अनुदान धान उत्पादकांना देण्याची मागणी मुंगटीवार यांनी केली. परंतु त्यावर ठोस उत्तर न देता मंत्री जयस्वाल यांनी पीकविम्यातून भरपाई मिळते, म्हणत वेळ मारून नेली. यावर मुंगटीवार यांनी मात्र मी पिच्छा सोडणार नाही, अशी भूमिका जाहीर केली. त्यावर विधानसभा अध्यक्षांनी मंत्र्यांनी आश्वासन दिलं आहे तर निर्णय होईल, असं म्हणत मुंगटीवार यांचं समाधान करण्याचा प्रयत्न केला.

मुंबईतील धोकादायक आणि जुन्या इमारतींच्या

केली, तर प्रथम इमारत मालकाला पुनर्विकासाची संधी दिली जाते. मालकाने ६ महिन्यांच्या आत प्रस्ताव सादर न केल्यास, भोगवटादारांच्या किंवा भाडेकरूंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला ही संधी दिली जाते. जर त्यांनीही ६ महिन्यांच्या आत प्रस्ताव सादर केला नाही, तर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत भूसंपादन करून पुनर्विकास करण्याची तरतूद केली आहे. या प्रक्रियेनुसार, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने ८५४ इमारत मालकांना नोटिसा बजावल्या आहेत. त्यापैकी ६७ मालकांनी पुनर्विकास प्रस्ताव सादर केले,त्यापैकी ३० मालकांना ना-हरकत प्रमाणपत्र () देण्यात आली आहे. राज्य शासन नवीन गृहनिर्माण धोरण आणत असून, यामध्ये सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध होतील याची सुनिश्चित केली जाणार आहे. रखडलेल्या पुनर्विकासामुळे मुंबईबाहेर गेलेल्या मुंबईकरांना परत मुंबईत आणणार तसेच मुंबईतील रखडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्काच्या घरांसाठी सरकार कटिबद्ध आहे

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. ७ मार्च २०२५

अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य यांचा अंबड, परतुर, घनसावंगी, मंठा दौरा

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा) गोरक्ष लोखंडे हे दि.७ मार्च २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार दि.७ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत अंबड नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत घनसावंगी नगर नगरपंचायत मुख्याधिकारी यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत परतूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत मंठा नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. सोयीनुसार मंठा येथून वाहनाने पुणेकडे प्रयाण करतील.

शेतकऱ्यांवरील संकट गडद; आत्महत्यांचे प्रमाण वाढले;१९ मार्चला होणार

अंबाजोगाई प्रतिनिधी

केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या घटून दहा ते पंधरा टक्के राहिली आहे. तरीही तेवढ्याच शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, जेवढ्या पन्नास ते साठ टक्के शेतकरी शेतीवर अवलंबून होते. याचा अर्थ असा की, केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबावरील संकट अधिक वाढले आहे. म्हणून या वर्षी किसानपुत्रांनी १९ मार्चला अन्नत्याग करून संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे आवाहन किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब यांनी केले आहे.

प्रतिकुटुंबाला अठरा हजार द्या

ज्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न येऊ लागले, त्या कुटुंबातील आत्महत्या टळल्या आहेत असे दिसून येते. राहिलेल्या दहा ते पंधरा टक्के शेतकऱ्यांच्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न कसे येईल याचा तातडीने विचार केला पाहिजे. सरकारी वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यासाठी अठरा हजार रुपये महिना ठरवले आहे, तसे अठरा हजार रुपये महिन्याला या कुटुंबांना पोचविण्याची तरतूद सरकारने करावी. यासाठी इतर अनुदान बंद करावी लागली तर ती बंद करावी, अशी सूचना अमर हबीब यांनी केली आहे.

विशेष अधिवेशन बोलवा

संपूर्ण महाराष्ट्र हादरवून टाकणाऱ्या साहेबराव करपे कुटुंबाच्या सामूहिक

आत्महत्येला एकोणीस मार्च रोजी एकोनचाळीस वर्षे होतात. या काळात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. परंतु लोकसभा व विधान सभेत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजलीचा अर्पण करणारा साधा ठराव देखील करण्यात आला नाही. राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या प्रती संवेदना शून्य झाले आहेत.

एकोणीस मार्च हा शेतकरी सहवेदना दिवस आहे, या दिवशी लोकसभा-विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे. आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत, यासाठी उपाययोजना करावी, असे आवाहन किसान पुत्र अमर हबीब यांनी केले आहे. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींना तसे पत्रही पाठविले आहे.

ग्रामपंचायतीचे ठराव

लोकसभा-विधानसभा दखल घेईल की नाही हे आज सांगता येत नाही, तरी आज गावो गावच्या ग्रामपंचायतीच्या, ग्रामसभांनी 'आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धाजली' अर्पण करणारा ठराव करून महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींना पाठवावा, अशी सूचना त्यांनी केली आहे.

उमरा येथे अन्नत्याग

एकोणीस मार्च २०२५ रोजी, अमर हबीब व त्यांचे सहकारी नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील उमरा या गावात अन्नत्याग करणार आहेत. या गावच्या भीमराव सिरसाट या शेतकऱ्याने काही वर्षांपूर्वी तहसील कार्यालयात फाशी घेऊन आत्महत्या केली होती. या गावात दुपारनंतर सहवेदना सभा होईल अशी माहिती किसान पुत्र आदोलक अमर हबीब यांनी दिली.

पान ६ वरून...

आ.प्रकाश सोळंकेंना

पाऊल टाकत विकासाच्या विविध योजना खेचून आणलेल्या आहेत. सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांना सोबत घेऊन चालणारा हा नेता कधीही चुकीच्या गोष्टीला थारा देत नाही. त्यामुळे चारित्र्यसंपन्न नेता म्हणून प्रकाश दादांची ख्याती महाराष्ट्रात आहे. आज बीड जिल्ह्याला प्रकाश दादा सारख्या एका चारित्र्यसंपन्न आणि सर्व समाजाला सोबत घेऊन जाणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे. अशा नेत्याकडे जर मंत्रीपद दिले तर जिल्ह्यातील सामाजिक सलोखा निर्माण होईल आणि जिल्ह्याच्या विकासाला गती मिळेल. पक्षाला देखील नवसंजीवनी मिळून बीड जिल्हा आणि मराठवाड्यात पक्ष्याची ताकद वाढेल. कार्यकर्त्यांना चांगलं बळ मिळेल आणि बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा बसून प्रशासन देखील चांगलं काम करेल. सलग पाच वेळा आमदारकी पटकाविलेले प्रकाश दादा यांना समाजाच्या प्रश्नांची जाण आहे. लोकांची दुःख दूर करण्यासाठी त्यांनी आहोरात्र प्रयत्न केलेले आहेत. अशा या ज्येष्ठ नेत्याला मंत्रीपद देऊन त्यांना एक चांगलं काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी सरपंच परिषद महाराष्ट्राचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष तथा लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांनी केली आहे.

आ.सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा-अजिंक्य वाघमारे

माजलगाव । प्रतिनिधी

लोकनेते महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय सुंदरराव सोळंके साहेबांचा मागील ३५ वर्षापासून वसा आणि वारसा चालवणारे माजलगाव मतदार संघाचे पाच वेळेस प्रतिनिधित्व करणारे आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब हे एक अभ्यासू आणि अनुभवी नेतृत्व म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. या मतदारसंघाचे नेतृत्व करत असताना त्यांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन मतदार संघाचा विकास केला आहे. माजलगाव मतदार संघात आजही सर्व जाती-धर्माचे लोक सुखाने आणि सौख्याने नांदत आहेत यामागे आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब यांचे सुसंस्कृत राजकारण आहे. या आधीही त्यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्रीपद सक्षमपणे सांभाळलेले आहे. त्यामुळे त्यांचा अनुभव आणि अभ्यास दांडगा आहे त्यामुळे मंत्रिमंडळात रिक्त झालेल्या जागेवर त्यांचा समावेश करावा अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजलगाव शहर उपाध्यक्ष अजिंक्य वाघमारे व संपूर्ण जिल्हाभरातून होत आहे तसेच बीड जिल्ह्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आमदार सोळंके सारखा संस्कृत पालकमंत्री असावा अशी ही मागणी होत आहे तरी या जनभावनेचा विचार करून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आमदार सोळंके यांना संधी द्यावी.

आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींच्या सन्मानासाठी किसानपुत्रांनी पुढाकार घ्यावा- कालिदास आपेट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पत्नींचा १९ मार्च २०२५ रोजी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह,अंबाजोगाई जि.बीड येथे दुपारी १ वाजता होणाऱ्या अन्नत्याग आंदोलन कार्यक्रमात साडीचोळी देवून सन्मान करण्यात येणार आहे.शेतकरी पुत्रांनी या सन्मान सोहळ्यात एका शेतकरी बहिणीचा सन्मान करण्यासाठी स्वतःहुन पुढे येवून या पवित्र कार्यात आपला खारीचा वाटा उचलावा असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केले आहे.

या संदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात कालिदास आपेट यांनी पुढे असे म्हटले आहे की, आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या प्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने १९ मार्च हा दिवस शेतकरी सहवेदना दिवस म्हणून पाळला जातो. याच दिवशी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन करुन विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

यावर्षी १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन निमित्ताने अंबाजोगाई येथे किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने सामुहिक उपवास, संवेदना रॅली, शेतकरी सहवेदना पुरस्कार वितरण, शेतकरी आत्महत्या; कारणं आणि मिमांसा या विषयावरील व्याख्यान आणि सामुहिक उपवास सोडण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याच कार्यक्रमातील मुख्य सोहळ्यात अंबाजोगाई परिसरातील आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करण्यात येणार आहे. या सन्मानाच्या खर्चाचा भार सर्व शेतकरी पुत्रांनी उचलावा अशी संकल्पना असून प्रत्येक एका शेतकरी पुत्राने एका बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करावा अशी अपेक्षा आहे.

शेतकरी संघटनेतर्फे या सन्मान सोहळ्यासाठी पुढाकार घेतला असून शेतकरी पुत्रांकडून बहिणीच्या सन्मानासाठी इच्छुक असणाऱ्या शेतकरी पुत्रांचा शोध घेण्यात येवून या सन्मानासाठी पुढे येणाऱ्या शेतकरी पुत्राचे स्वागत करण्यात येत आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त बहिणींचा सन्मान करण्याचे उद्दीष्ट असून शेतकरी पुत्राच्या आर्थिक योगदानातुनच हा उपक्रम यशस्वी होणार आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी व विधवा बहिणींचा साडीचोळी देवून सन्मान करण्यासाठी शेतकरी पुत्रांनी मोठ्या संख्येने पुढे यावे व १९ मार्च रोजी अंबाजोगाई येथे अन्नत्याग आंदोलन निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन कालिदास आपेट यांनी केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अंकुशराव जाधव, कार्याध्यक्षपदी केतन प्रधान

माजलगाव । प्रतिनिधी

विश्वभुषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्यासाठी शहरातील भीमनगर येथील उत्सव समितीच्या अध्यक्षपदी आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते अंकुश अण्णा जाधव तर कार्याध्यक्ष पदी केतन प्रधान, सचिन वाघमारे यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली. आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते राजेंद्र टाकणखार यांच्या अध्यक्षतेखाली ५मार्च रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक स्थळी झालेल्या बैठकीत निवडण्यात आलेली उर्वरित उत्सव समितीच्या सचिव पदी किशोर सातपुते, उपाध्यक्षपदी प्रदिप साळवे,सचिन टाकणखार तर कोषाध्यक्षपदी जेष्ठ नेते नवनाथ अण्णा धाईजे यांची निवड करण्यात आली आहे. या समितीला सल्ला देण्यासाठी सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली असुन यात नपचे माजी उपाध्यक्ष कचरू खळगे सह राजेंद्र टाकणखार, टि.आर.जावळे,प्रदिप पट्टेकर, सदानंद भैय्या प्रधान, अनंत वाघमारे, सुधाकरराव निसर्गंध, प्रकाश शिंदे, गणेश जावळे यांची निवड करण्यात आली आहे. बैठकीस उपस्थितीतांचे आभार प्रदिप साळवे यांनी मानले तर निलेश कांबळे, मयुर प्रधान, राजरतन खळगे, शिशिर प्रधान, विशाल सोनपसारे,रूषिकेश सोनवणे,राहुल मस्के,सतीष स्वामी, विश्वजीत साळवे, प्रविण ओव्हाळ, प्रविण निसर्गंध, सुजल खळगे,चेतन जावळे, रविराज भालेराव,अभिजीत घाडगे,किरण जावळे,मुसा धापसे,सौरभ सरपते आदी तरुणांची उपस्थिति होती.

जयभवानी महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रकाचे विमोचन

पाटोदा । प्रतिनिधी

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील अर्थशास्त्र विभागामार्फत भारतीय आर्थिक सुधारणांचे शिल्पकार डॉ. मनमोहन सिंग यांच्या विचारावर आधारित भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जयभवानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा. श्री. प्रमोद गोरकर, लेखापाल मा. श्री. प्रतापराव हाटोटे, सहलेखापाल मा. श्री. श्रीराम शेळके, प्रभारी प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे हे होते. या मान्यवरांच्या शुभहस्ते भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. हे भित्तीपत्रक कु. ज्ञानेश्वरी शिंदे, कु. सानिका कासरे, कु. निकिता मकाळ, राहुल काकडे, रोहित वाघमारे आणि यश वाल्हेकर या विद्यार्थ्यांनी तयार केले. हे भित्तिपत्रक तयार करण्यासाठी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिवाजी काकडे यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. मनमोहन सिंग हे भारताच्या आर्थिक सुधारणा प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणारे व्यक्ती होते. त्यांनी १९९१ साली भारताच्या अर्थमंत्री पदावर असताना उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण धोरणे अंमलात आणली. ज्यामुळे भारताची अर्थव्यवस्था स्थिर होण्यास मदत झाली आणि ती वेगाने विकसित होऊ लागली. डॉ.मनमोहन सिंग यांच्या मते, भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक स्तरावर प्रगती करायची असल्यास आर्थिक सुधारणांना पर्याय नाही. त्यांच्या मते, भारताच्या आर्थिक वाढीला गती मिळण्यासाठी पायाभूत सुविधा आणि शिक्षणावर भर द्यावा लागेल.

संतोष देशमुख यांच्या हत्याऱ्यांना फाशी देण्याच्या मागणीसाठी घनसावंगीत रास्ता रोको आंदोलन

घनसावंगी । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याऱ्यांना फाशी द्या व गुन्हेगारांना पोसणाऱ्या आकांना या गुन्ह्यात सहआरोपी करावे या मागण्यासाठी दि ६ रोजी घनसावंगी सूतगिरणी चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे.

माणुसकीला काळीमा फासणाऱ्या मस्साजोग हत्या प्रकरणातील आरोपीना लवकरात लवकर फाशी देऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा तसेच धनंजय मुंडेना याप्रकरणात सह आरोपी करून सखोल चौकशी करण्याच्या प्रमुख मागणीसाठी

सूतगिरणी चौक येथे हा रास्ता रोको करण्यात आला होता. दरम्यान समाज माध्यमावर संतोष देशमुख यांच्या मारहाणीचे फोटो व्हायरल झाल्याने या क्रूर घटनेचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. या रास्ता रोको आंदोलनामुळे अंबड पाथरी रोडवर वाहनांच्या मोठ्या रांगाच रांगा लागलेल्या होत्या शेवटी राष्ट्रगीताने या रास्ता रोकोचा समारोप करण्यात आला.यावेळी पोलिसांचा मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

बीड जिल्ह्यातील लॅब तंत्रज्ञांच्या पहिल्या सीएमईचे अंबाजोगाई येथे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

असोसिएशन ऑफ क्लिनिकल लॅबोरेटरी ऍनालिस्टस ऍंड प्रॅक्टिशनर्स या संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्याचे उपाध्यक्ष विश्वास चोबे यांच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यातील पहिली सीएमई अंबाजोगाई येथे नुकतीच यशस्विरित्या आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर अंबाजोगाई आयएमएचे अध्यक्ष डॉ.एन.बी.घुगे, सुप्रसिद्ध छाती विकार तज्ज्ञ डॉ.राहुल धाकडे, डॉ.विवेक मुळे, डॉ.बालासाहेब लोमटे, डॉ.सुलभा पाटील (अध्यक्षा, एएमपीए) हे मान्यवर उपस्थित होते. रविवार, दिनांक २ मार्च रोजी आयोजित सीएमई व नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकारी यांचा बीड जिल्हा शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सुरूवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीड जिल्हाध्यक्ष दामोधर संदीकर यांनी केले. त्यांनी बीड जिल्ह्यातील पहिली सीएमई अंबाजोगाई येथे आयोजित करण्यामागची पार्श्वभूमी व विधायक हेतू आहे असे नमूद केले. यावेळी बोलताना डॉ.राहुल धाकडे यांनी असोसिएशन ऑफ क्लिनिकल लॅबोरेटरी ऍनालिस्टस ऍंड

प्रॅक्टिशनर्स या संघटनेचे उद्दिष्ट सांगताना महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल कशा पद्धतीने आली याचा आवर्जून उल्लेख केला. या ठिकाणी राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या ईडीजीई लॅब्स कंपनीने या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती दर्शवली होती. या सीएमईमध्ये सहभागी सर्व तंत्रज्ञांना डॉ.अमित लोमटे यांनी मायक्रो बायोलॉजी या विषयावर मार्गदर्शन करताना सुलभ आणि सोप्या भाषेतून व्याख्यान दिले. त्याचबरोबर बी.डी.सिरींज या आंतरराष्ट्रीय कंपनीचे सदानंद घुले यांनी देखिल बायो वेस्ट ऍंड वेस्ट मॅनेजमेंट या विषयावर अतिशय मौलिक व उपयुक्त माहिती दिली. त्यानंतर सांगता समारंभामध्ये एसीएलएपीचे अध्यक्ष प्रशांत गुळेकर (कोकण), सचिव रमेश चौगुले (कोल्हापूर), सहसचिव राजेश गरूड (परभणी), उपाध्यक्ष गणेश बोंढारे (नांदेड) संभाजी पाटील (अध्यक्ष, नांदेड), शंकर काळे (अध्यक्ष, लातूर) हे आवर्जून उपस्थित होते. सीएमईच्या सांगता समारंभामध्ये मार्गदर्शन करताना महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रशांत गुळेकर यांनी महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल या शिवाय लॅबोरेटरी कायदे, बायो वेस्टेज याची आवश्यकता का आहे ? आणि आपण पुढील कायदेशीर वाटचाल कशी होणार आहे, याबाबतचे परिपूर्ण मार्गदर्शन केलं. तसेच राजेश गरूड यांनी आपल्या सहज सोप्या भाषेमध्ये लॅबोरेटरी चालवताना येणाऱ्या आव्हानांना कसे सामोरे जायचे याचे परिपूर्ण मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन गौरशेटे यांनी केले तर सहभागी उपस्थितांचे आभार बीड जिल्हा उपाध्यक्ष विश्वास चोबे यांनी मानले. बीड जिल्ह्यातील पहिल्या अंबाजोगाई येथे आयोजित सीएमईसाठी संपूर्ण बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातून लातूर, धाराशिव, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यातून १५० ते २०० तंत्रज्ञांची उपस्थिती होती. एवढा मोठा कार्यक्रम मराठवाड्यात यापूर्वी झालेला नाही अशी चर्चा यावेळी सहभागी तंत्रज्ञांकडून ऐकावयास मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगीराज बर्दापूरे, सुरेश पिंपळे, राम मोरे, विश्वास चोबे, दिनेश ढोले पाटील, नितीन काकडे, रईस सय्यद, चंद्रकांत गायकवाड, गणेश कापरे, दिगंबर कदम, अमेर पठाण, राजपाल लोमटे, अजय शिंदे, किरण सरवदे, संतोष खाकरे, सत्तार शेख, महादेव पतंगे, अशोक इंटरपाईजेस यांच्यासह असोसिएशन ऑफ क्लिनिकल लॅबोरेटरी ऍनालिस्टस ऍंड प्रॅक्टिशनर्स या संघटनेच्या बीड जिल्हा व अंबाजोगाई तालुका शाखेच्या वतीने परीश्रम घेण्यात आले.

शेतकरी कर्जमाफी सरकार टाळणार?

शेतकऱ्यांनाही लाडक्या बहीणींचा नियम लावणार?

निवडणुकीत दिलेले कर्जमाफीचे आश्वासन १० मार्चला अर्थसंकल्पात पूर्ण होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. पण लाडक्या बहीणींना २१०० रुपये देण्याचे आश्वासन अर्थसंकल्पात पूर्ण करू असे सांगितले नाही, पुढील ५ वर्षात पूर्ण करू, असा पवित्रा सरकानरे घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांचा जीव पुन्हा टांगणीला लागला आहे. सरकार कर्जमाफी आताच करणार की लाडक्या बहीणींप्रमाणेच शेतकऱ्यांनाही झुलवत ठेवणार? याची चिंता शेतकऱ्यांना आहे.

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत सरकारने काही आश्वासने दिली होती. त्यात महत्वाचं आश्वासन म्हणजे लाडक्या बहीणींना दिला जाणारा हप्ता १५०० वरून २१०० रुपयांपर्यंत वाढवला जाईल आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली जाईल, ही दोन महत्वाची आश्वासने होती. निवडणुका झाल्यानंतर हा राज्याचा पहिला पूर्ण अर्थसंकल्प आहे. त्यामुळे लाडक्या बहीणींना आणि शेतकऱ्यांना या अधिवेशनात आपल्याला दिलेली आश्वासने पूर्ण होतील, अशी आशा आहे. मात्र लाडक्या बहीणींची निराशा सरकारने आधीच केली आहे. ज्यांच्या विभागाकडून ही योजना राबविली जाते त्या राज्याच्या महीला आणि बालविकास मंत्रा आदीती तटकरे यांनी लाडक्या बहीणींच्या आशेवर पाणी फेरण्याचे काम केले. अधिवेशन वा अर्थसंकल्पातच २१०० रुपये देणार असे आश्वासन मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांनी दिलेले नाही, असे त्यांनी सांगितले. तसेच निवडणुकीतील आश्वासन ५ वर्षात पूर्ण करण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या. म्हणजेच लाडक्या बहीणींना याच अर्थसंकल्पात २१०० मिळणार नाहीत, हे स्पष्ट झाले. सरकारने लाडक्या बहीणींची जशी आश्वासन देऊन फसवणूक केली तशीच फसणूक शेतकऱ्यांचीही करणार का? अशी शंका शेतकरीही उपस्थित करू लागले आहे. कर्जमाफी विषयी सरकारकडून अद्यापही कुठलेही अधिकृत स्पष्टीकरण आले नाही. त्यामुळे सरकार या अर्थसंल्पातही कर्जमाफीला बगल देणार का? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत. सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे आश्वासन सरकारने दिले आहे. राज्यातील शेतकऱ्यांवर जवळपास ३१ हजार कोटींचा बोजा आहे. सरकार हे कर्ज माफ करून खाते निल करेल, अशी आशा शेतकऱ्यांना आहे. सरकारने आता खाते निल केले तर शेतकऱ्यांना खरिपातील पेरण्यांसाठी कर्जे उपलब्ध होतील. पण सरकारने लाडक्या बहीणींची जी बोळवण केली, त्यामुळे शेतकऱ्यांना मनात संभ्रम तयार झाला आहे. सरकारची मानसिकता 'काम सरो आणि वैद्य मरो' अशी तर नाही ना, अशी शंका शेतकरी उपस्थित करत आहेत.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१७७१ : हैदर आणि मराठे यांच्यात प्रसिध्द अशी मोती तलावाची लढाई झाली.
१८७६ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल याला टेलिफोनचे पेटंट मिळाले.
१९३६ : दुसरे महायुद्ध व्हर्सायचा तह धुडकावून जर्मनीने हॉईनलँडमधे सैन्य घुसवले.
१९८३ : नवी दिल्ली येथे सातव्या अलिप्त राष्ट्रपरिषदेस आजच्याच दिवशी सुरुवात झाली.
२००६ : लष्कर-ए-तैय्यबा या आतंकवादी संघटनेने वाराणसी येथे बॉम्बस्फोट घडवून आणले.
२००९ : केपलर स्पेस ऑब्झर्व्हेटरी या संशोधन संस्थेची स्थापना.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५०८ : हुमायून दुसरा मुघल सम्राट (मृत्यू: १७ जानेवारी १५५६)
१७६५ : फोटोग्राफी चे शोधक निसेफोरे नाऐप्से यांचा जन्म. (मृत्यू: ५ जुलै १८३३)
१७९२ : सर जॉन विल्यम हर्षेल ब्रिटिश गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ, रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचा संस्थापक (मृत्यू: ११ मे १८७१)
१८४९ : ल्यूथर बरबँक महान वनस्पतीतज्ञ (मृत्यू: ११ एप्रिल १९२६)
१९११ : सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन तथा 'अज्ञेय' ज्ञानपीठ पारितोषिक (१९७८) व साहित्य अकादमी पुरस्कार (१९६४) विजेते हिन्दी लेखक व वृत्तपत्रकार (मृत्यू: ४ एप्रिल १९८७ नवी दिल्ली)
१९१८ : मराठी साहित्यिक स्नेहलता दत्तात्रय दसनूरकर यांचा जन्म.
१९३४ : नरी कॉन्ट्रॅक्टर भारताचा यष्टिरक्षक
१९४२ : उमेश कुलकर्णी, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९५२ : सर विवियन रिचर्ड्स वेस्ट इंडिजचे क्रिकेटपटू
१९५५ : अनुपम खेर चित्रपट अभिनेता

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६४७ : दादोजी कोंडदेव छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरू (जन्म: १५७७)
१९२२ : गणपतराव जोशी रंगभूमीवरील असामान्य अभिनेते, शेक्सपियरच्या नाटकांतील त्यांच्या भूमिका अतिशय गाजल्या होत्या (जन्म: १५ ऑगस्ट १८६७)
१९५२ : परमहंस योगानंद, भारतीय तत्त्वज्ञ.
१९५७ : मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कुमाँऊ परिषदेची स्थापना केली. (जन्म: १० सप्टेंबर १८८७)
१९६१ : गोविंद वल्लभ पंत स्वातंत्र्यसैनिक, भारताचे चौथे गृहमंत्री व उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे पहाडी पुरूष, प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष, भारतरत्न
१९७४ : माजी अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी यांचे निधन.
१९९३ : इर्झा मीर माहितीपट निर्मितीचे आद्य प्रवर्तक (जन्म: २६ आक्टोबर १९००)
२००० : प्रभाकर तामणे साहित्यिक व पटकथालेखक (जन्म: २९ आक्टोबर १९३१)
२०१२ : रवि शंकर शर्मा ऊर्फ 'रवि' संगीतकार (जन्म: ३ मार्च १९२६)
२०१५ : भारतीय वकील आणि राजकारणी जी. कार्तिकेयन यांचे निधन. (जन्म: २० जानेवारी १९४९)

असा असावा दुधाळ जनावरांचा आहार

दुधाळ जनावराच्या आहारामध्ये मुख्य पोषक तत्वे आणि त्यांचे विभिन्न स्रोत गरजेचे असते. इतर जनावराप्रमाने दुधाळ पशुमध्ये सुद्धा पाच पोषक तत्वे उर्जा, प्रथिने, खनिज पदार्थ, जीवनसत्वे आणि पाण्याची गरज असते. हे सर्व पोषक तत्वे आहारामधून प्राप्त होत असतात. त्यामुळे आहारातून या सर्व घटकाची पुर्तता होईल, याची खातरजमा करावी जेणेकरून शरीरवाढ, गाभणकाळ व दूध उत्पादन योग्य रीतीने घेता येईल. जनावराच्या आहारामध्ये खुराक व हिरवा किव्हा वाळलेला चारा (भूसा, कड़बा किंवा कुटार) असे दोन मुख्य प्रकार पडतात. खुराक हा वेगवेगळ्या खाद्य घटकापासून ज्यामध्ये प्रामुख्याने धान्य, तेलबियांची ढेप, दाळीच्या चुनी, कृषि-औद्योगिक उपउत्पादने, खनिज पदार्थ आणि जीवनसत्वे याना योग्य प्रमाणामध्ये मिसळवून तयार केला जातो. हा खुराक सर्व पोषण मुल्ये प्रामुख्याने उपलब्ध करून देणारा एक मुख्य स्त्रोत आहे.

खुराक वासरासाठी, दुधाळ तसेच गाभण जनावरासाठी आणि वळूसाठी संतुलित पोषक आहार पुरवठा करण्याचे काम करते आणि त्यांचे योग्य प्रमाण अधिक उत्पादनासाठी ठरवणे गरजेचे आहे. गाईसाठी सरासरी ४०० किलोग्रॅम खुराकाची गरज असते. शरीर चलनासाठी १.५ ते २ किलोग्राम, दूध उत्पादनासाठी (अतिरिक्त) ४०० ग्राम/प्रती लिटर तर गाभण जनारांसाठी (शेवटचे दोन महिने/अतिरिक्त) १.५ किलोग्रम खुराक गरजेचा असतो. तर म्हशीसाठी सरासरी ५०० किलोग्रॅम खुराकाची गरज असते. शरीर चलनासाठी २ ते २.५ किलोग्राम, दूध उत्पादनासाठी (अतिरिक्त) ५०० ग्राम/प्रती लिटर तर गाभण जनारांसाठी (शेवटचे दोन महिने/अतिरिक्त) २.५ किलोग्रम खुराक गरजेचा असतो. कमी दूध उत्पादन असणाऱ्या जनावराला सहसा खुराक दिला जात नाही. त्याना फ़क्त कुटार किंवा थोड्या प्रमाणात हिरवा चारा दिला जातो. त्यामुळे खनिज पदार्थाच्या कमतरतेची शक्यता वाढते. अशा जनावरांना दररोज ५० ग्राम खनिज मिश्रण अवश्य दिला पाहिजे. खुराक तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या खाद्य घटकाचे प्रमुख पाच प्रकार पडतात. १०० किलो खुराक तयार करण्यासाठी त्यांचे विभाजन पुढील प्रमाणे करता येतो.

असा आसावा शेळ्यांचा आहार

खुराक तयार करताना वापरण्यात येणाऱ्या धान्य, तेलबियांची ढेप, आणि कृषि उपउत्पादने यांचे प्रमाण हे पशुंच्या शारीरिक स्थिती, अवस्था आणि दूध उत्पदानावर अवलंबून असते. खुराक पशुआहार तज्ञाच्या सल्ल्याने तयार करून घ्यावा. जनावराच्या आवश्यकतेनुसार आहारामध्ये ऑडीटीव्ह टाकले जातात. वरील खाद्य घटकांचा वापर करुन पशुपालक घरीच खुराक तयार करू शकतात.

हिरव्या चाऱ्याच्या उपलब्धतेनुसार खुराक तयार करताना घ्यावयाची काळजी

जनावरासाठी मुख्यत: दोन प्रकारचा चारा उपलब्ध आहे. शेंगाधारी म्हणजेच द्विदल (बरसीम, लुसर्न, चवळी ई.) यामध्ये प्रथिनाचे प्रमाण २० % असते. एकदल चारापिके (मक्का, ज्वारी, बाजरा, नेपिअर आणि अन्य गवत) यामध्ये प्रथिनाचे प्रमाण ८ ते १२ % असते. दुधाळ जनावराकरिता चांगल्या दूध उत्पादनासाठी आहारामध्ये १२ ते १४ % प्रथिनांची गरज असते. प्रथिने सर्वात महाग पोषक तत्त्व असल्यामुळे पशुंच्या आवश्यकतेनुसार आणि द्विदल चाऱ्याच्या उपलब्धतेनुसार खुराकामध्ये प्रथिनयुक्त घटकांचे प्रमाण कमी केले जाऊ शकते आणि पशु आहार चांगला आणि स्वस्त बनविला जाऊ शकतो. जर पशुपालक मुरघास तयार करीत असेल तर मुरघासामध्ये उपलब्ध पोषकतत्वानुसार खुराक तयार केला पाहिजे.

फायद्याच्या टिप्स : भर उन्हाळ्यातील शेळीपालनाच्या १२ टिप्स

हिरवा चारा देताना दूध उत्पादन लक्षात घ्यावे, अधिक दूध उत्पादन असेल तर हिरवा चारा जास्त द्यावा. सुखा चाऱ्यामध्ये गव्हांडा, तणस, चना कुटार, सोयाबीन कुटार, ज्वारीचा कडबा इत्यादीचा वापर करता येईल. यामध्ये चना कुटाराचे पोषणमुल्ये जास्त आहेत तसेच ज्वारीच्या कडब्यामध्ये सुद्धा पोषणमुल्ये प्रमाणात असतात. कमी जागेत कडब्याचे उत्पादन जास्त प्रमाणात मिळते, याउलट गव्हांडा व तणस निकृष्ठ दर्जाचे कुटार आहे, परंतु हे जनावरांचे पोट भरण्यासाठी वापरले जाते. अश्यावेळेस खुराकाची गुणवत्ता व मात्रा योग्य प्रमाणात ठेवावी. साधारणता एका जनावराला ५ किलो कुटार, १० किलो हिरवा चारा, व १.५ ते २ किलो खुराक याप्रमाणे आहाराची गरज असते व दूध उत्पादनानुसार यामध्ये खुराकमध्ये वाढ करावी. तसेच हिरवा चारा सुद्धा वाढवावा.

संक्रमण काळामध्ये दुधाळ जनावराचे पोषण व्यवस्थापन

संक्रमण काळ हा प्रसुतीच्या ३ आठवडे पहिले आणि ३ आठवड्यानंतरचा काळ असतो. हा काळ दुधाळ जनावराचा जीवनकाळामधला सर्वात कठीण आणि महत्वपूर्ण काळ आहे. या काळामध्ये जनावर गाभण असताना दूध देण्याच्या अवस्थेत प्रवेश करतात. ज्यामुळे पशुमध्ये संक्रमित रोगांची तसेच चयापचय समस्येला आहारी जाण्याची दाट शक्यता असते. प्रसुतीच्या २ महिन्यापूर्वी जनावर आपल्या शरीर वजनाच्या २ % प्रमाणे शुष्क आहार खातो.

नांदेड विभागातील दहा कारखान्यांचा पट्टा पडला

प्रादेशिक सहसंचालक (साखर) नांदेड कार्यालयांतर्गत नांदेड विभागातील १० साखर कारखान्यांचा पट्टा पडला आहे. विभागात आजपर्यंत या कारखान्यांनी ९४ लाख ११ हजार ३५८ टन उसाचे गाळप, तर ९० लाख आठ हजार ८५३ क्विंटल साखरेचे उत्पादन केल्याची माहिती प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयाने दिली. प्रादेशिक सहसंचालक (साखर) नांदेड विभागातील नांदेडसह परभणी, हिंगोली व लातूर या चार जिल्ह्यांतील गाळप हंगाम २०२४-२५ साठी २९ कारखान्यांनी गाळप सुरू केले. यात १९ खासगी, तर १० सहकारी साखर करण्यांचा समावेश होता. यंदा हंगामाची सुरुवात १५ नोव्हेंबरपासून झाली. यंदा विभागातील २९ कारखाने सुरू झाली होती. यात परभणी जिल्ह्यात सात खासगी, हिंगोली जिल्ह्यात दोन खासगी व तीन सहकारी, नांदेड जिल्ह्यात पाच खासगी व एक सहकारी, तसेच लातूरजिल्ह्यातील पाच खासगी व सहा सहकारी कारखान्यांचा समावेश आहे. सध्या उन्हाचा चटका जाणवत आहे. तसा कारखान्यांचे गाळपही कमी होत आहे. यामुळे विभागाचा गाळप हंगाम आटोपतीकडे चालला आहे. २ मार्चपर्यंत नांदेड विभागातील दहा कारखान्यांचा पट्टा पडला आहे. आजपर्यंत या कारखान्यांनी ९४ लाख ११ हजार ३५८ टन उसाचे गाळप, तर ९० लाख ८ हजार ८५३ क्विंटल साखरेचे उत्पादन केल्याची माहिती साखर सहसंचालक कार्यालयाकडून मिळाली. विभागाचा सरासरी साखर उतारा ९.५७ टक्के असल्याची माहिती मिळाली. नांदेड विभागातील बंद झालेल्या दहा कारखान्यात लातूर जिल्ह्यातील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखाना, लातूर, शेतकरी सहकारी साखर कारखाना किल्लारी, ओकांर साखर कारखाना प्रा.लि., विलास सहकारी साखर कारखाना लि. निवळी, संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना बेलकूड, रेणा सहकारी साखर कारखाना निवाडा, साईबाबा शुगर्स लि. शिवणी, जागृती शुगर ॲण्ड अलाइड तळेगाव, ट्रॉंटीवन शुगर ॲण्ड अलाइड माळवटी तर परभणी जिल्ह्यातील श्री रेणुका शुगर लि. देवनांद्रा पाथरी या कारखान्यांचा समावेश आहे.

वर्षातून चार वेळा उत्पन्न देणारी पीसीयूएच काकडी

उन्हाळा सुरू झालेला आहे आणि यावेळी काकडीची मागणी जोर धरते. सध्या महाराष्ट्रात वेगवेगळ्या प्रकारच्या काकडीच्या जाती आहेत. पण अशी एक काकडीची जात आहे जिची लागवड वर्षातून चार वेळा करता येते. या काकडीचे नाव आहे पीसीयूएच काकडी.

पीसीयूएच काकडीची वैशिष्ट्ये : या जातीची काकडी वर्षभर लागवडीसाठी उत्तम पर्याय असून या काकडीपासून उत्पन्न सुद्धा चांगले मिळते. पेरणीनंतर काही दिवसांत ही जात काढणीला तयार होते, तसेच या जातीच्या काकडीचा लागवड खर्चही कमी आहे. काकडीच्या या जातीचे बियाणे बाजारात शेतकऱ्यांना सहज उपलब्ध आहे.

या काकडीच्या लागवडीसाठी योग्य प्रमाणात पाणी लागते. तणमुक्त शेतात आणि ठिबक सिंचन तंत्राचा वापर करून काकडीचे चांगले उत्पादन घेता येते.

कांद्यावरील रोगांचे नियंत्रण असे करा

कांद्याचे सरासरी उत्पादन इतर देशांच्या तुलनेत कमी आहे. याची अनेक कारणे आहेत; त्यापैकी महत्त्वाचे कारण म्हणजे कांदा या पिकावर पडणारे रोग हे आहे. विशेषत: कांद्यावरील काही रोगाचा परिणाम त्याच्या साठवणीवर होतो. त्यामुळे नुकसान वाढते. मात्र रोगाचे वेळीच नियत्रण केल्यास कांदा उत्पादनात चांगलचा फरक पडतो. कांदा पीकावर प्रामुख्याने मर, काळा करपा, पांढरी सड, मूळकूज, सूत्रकृमी, तपकिरी करपा, केवडा, मानकूज, काळी बुरशी, निळी बुरशी, विटकरी सड, काजळी आदी रोग पडतात.

मररोग : हा रोग स्क्लेरोशियम रॉल्फसी नावाच्या बुरशीमुळे होतो. यामुळे रोपे पिवळी पडतात. जमिनीलगतच्या रोपांचा भाग मऊ पडतो आणि रोपे कोलमडतात व नंतर सुकतात. या रोगामुळे रोपांचे १० ते ९० टक्के नुकसान होते. लागवडीनंतर हा रोग कांद्याच्या शेतातदेखील मोठ्या प्रमाणात पसरतो. खरीप हंगामातील हवामान या रोगास अनुकूल असते. अधिक आर्द्रता व २४ ते ३० अंश सें. तापमान या रोगाच्या बुरशीच्या वाढीस उपयुक्त ठरते.

उपाय : पेरणीपूर्वी बियांना डायथिथोकार्बामेट किंवा कार्बोक्सिन हे औषध दोन ते तीन ग्रॅम प्रतिकिलो या प्रमाणात चोळावे. रोपे नेहमी गादी वाफ्यावर तयार करावीत. रोपवाटिकेची जागा प्रत्येक वेळी बदलावी. एवढे करून रोगाचा प्रादुर्भाव दिसलाच तर दोन रोपांच्या ओळीत कॅप्टन किंवा कार्बोक्सिनचे द्रावण ओतावे, २० ग्रॅम औषध १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे.

काळा करपा : महाराष्ट्रात खरीप हंगामात या रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. हा रोग कोलिटोट्रायकम ग्लेओस्पोराईडस्? नावाच्या बुरशीमुळे होतो. सुरूवातीला पानाच्या बाहेरील बाजूंवर व बुडख्याजवळील भागावर राखाडी रंगाचे ठिपके दिसतात. त्यावर बारीक गोलाकार आणि उठावदार ठिपके वाढू लागतात. ठिपक्यांचे प्रमाण वाढल्यामुळे पाने वाळतात. एकापाठोपाठ पाने वाळत गेल्यामुळे कांद्याची वाढ होत नाही. खरीपातील दमट आणि उबदार हवामानात या रोगाच्या बुरशीची वाढ झपाट्याने होते. पाण्याचा निचरा न होणे, ढगाळ वातावरण आणि सतत झिमझिम पडणारा पाऊस यामुळे रोगाचे प्रमाण वाढते व माना लांब होतात. या रोगाची सुरूवात फुलकिड्याने पातीवर केलेल्या जखमेमुळे होते. म्हणून या फुलकिड्यांचे नियंत्रण केल्यास हा रोग लवकर आटोक्यात येतो.

उपाय : मॅन्कोझेब (०.३ टक्के) ३० ग्रॅम किंवा कार्बेन्डॅझिम (०.२ टक्के) २० ग्रॅम औषध १० लिटर पाण्यात मिसळून दर १२ ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारावे. पुर्नलागण करताना रोपे कार्बेन्डॅझिम किंवा क्लोरोथॅलोनिल (कवच) या औषधाच्या ०.२ टक्के द्रावणात बुडवून घ्यावीत. रोपे गादीवाफ्यावर तयार करावीत. बी पातळ पेरावे. रोपातील गवताची खुरपणी त्वरीत करावी. लागवड सरीवरंब्यावर करावी. वरंब्यावर रोपे दोन्ही बाजूवर एकाच ओळीत लावावीत. बाजूवर दोन व वरंब्याच्या माथ्यावर एक अशी लागवड करू नये त्यामुळे रोपांची दाटी वाढते व रोगाचे प्रमाणदेखील वाढते.

पांढरी सड : हा रोग स्क्लोरोशियम रॉल्फसी या बुरशीमुळे होतो. ही बुरशी पुर्नलागण केलेल्या रोपांच्या मुळावर वाढते. रोपांची किंवा झाडांची पाने जमिनीलगत सडतात. पानांचा वरचा भाग पिवळा पडतो. वाढणार्या कांद्याला मुळे राहत नाहीत. कांद्यावर कापसाप्रमाणे बुरशी वाढते. त्यावर पांढरे दाणे तयार होतात. कांदा सडतो. पांढर्या सडीचा प्रादुर्भाव पुर्नलागवडीनंतर लगेच झाला तर कांदा पोसत नाही. कांदा तयार झाला असेल तेव्हा कांदा सडतो. खरीप तसेच रब्बी हंगामातही या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होतो. पाण्याचा निचरा चांगला न होणार्या शेतात या रोगाची तीव्रता अधिक असते. या रोगामुळे ५० ते ६० नुकसान होऊ शकते. या रोगाची बुरशी जमिनीत बरीच वर्षे राहू शकते.

उपाय : रोपाच्या माध्यमातून तसेच पूर्व हंगामातील कांदा पिकामधून या बुरशीचा प्रसार होतो. मररोग होऊ नये म्हणून जे उपाय केले जातात, त्यामुळे हा रोग टाळता येतो. एकाच शेतात वर्षानुवर्षे कांद्याची लागवड करू नये. कांद्याची तृणधान्यासोबत फेरपालट करावी. खरीपातील लागवड नेहमी पाण्याचा चांगला निचरा होणार्या जमिनीत करावी. रोपांची मुळे लागवडीपूर्वी कार्बेन्डॅझिम द्रावणात एक ते दोन मिनीटे बुडवून घ्यावीत. त्यासाठी २० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे.

मूळकुज : हा रोग बहुतेक कांदा उत्पादक भागात आढळतो. विशेषत: अधिक तापमान आणि आर्द्रता असणार्या भागात या रोगाची तीव्रता अधिक असते. हा रोग फ्युजेरियम ऑक्सिस्पोरम या बुरशीमुळे होतो. या रोगामुळे कांद्याची पाने पिवळी पडतात व पिवळेपणा बुडख्याकडे वाढत जातो. नंतर पाने सुकून कुजतात. महाराष्ट्रात खरीप हंगामात ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात या रोगाची तीव्रता सर्वाधिक असते.

उपाय : या रोगाची बुरशी जमिनीत राहते. त्यामुळे पिकाची फेरपालटकरणे महत्त्वाचे ठरते. जमिनीची खोल नांगरट करून उन्हाळ्यात तापू द्यावी. थायरम हे बुरशीनाशक चोळून बी पेरणे. (एक किलो बियांसाठी दोन ग्रॅम थायरम हे प्रमाण वापरावे.)

तळकुजव्या (बेसल रॉट) : फ्युजेरियम ऑक्सिस्पोरम या जमिनीत राहणार्या बुरशीमुळे होतो. जमिनीत अधिक ओलावा, कांदे काढणीचे वेळ पाऊस प्रसार होतो. बिजोत्पादनक्षेत्रातही या रोगाचा प्रादुर्भाव होतो. या रोगाची सुरूवात पाती पिवळी पडून होते. रोपांची वाढ थांबून पात हळूहळू सुकू लागते आणि सडण्याची क्रिया सुरू होऊन नंतर जमिनीखालील भाग सडून पूर्ण रोप मरून जाते.

उपाय : एक वर्षासाठी पिकाची फेरपालट करावी. ट्रायकोर्डमा विरिडी जैविक बुरशी १२५० ग्रॅम प्रति १२५ किलो शेणखतात मिसळून कांदा लावण्याच्या अगोदर शेतात मिसळावी. कार्बेन्डॅझिम प्रतिलिटर एक ग्रॅम या प्रमाणात द्रावण तयार करून त्यामध्ये बिजोत्पादनासाठी लावावयाचे कांदे दहा मिनीटे बुडवून नंतर लावावे. कार्बेन्डॅझिम किंवा बेनलेट एक ग्रॅमप्रमाणे किंवा कॅप्टान दोन ग्रॅम प्रतिलिटर प्रमाणे कांदे काढणीच्या २० आणि १० दिवस अगोदर पिकामध्ये फवारणी केल्यास साठवणीत या रोगाचा प्रसार होत नाही.

कंद व खोड कुजविणारे सूत्रकृमी : डिटीलिंकस डिपसॅसी या नावाच्या सूत्रकृमीमुळे कंद किंवा खोड कुजते. झाडाच्या कोणत्याही अवस्थेत सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊ शकतो. सूत्रकृमींचा प्रसार कांद्याचे बी, कांद्याच्या पाती, सडके कांदे यामार्फत होतो. कृमींचा प्रादुर्भाव झाला तर कंदाच्या वरच्या भागाजवळील म्हणजे मानेजवळील पेशी मऊ होतात. हळूहळू कृमी कांद्यामध्ये शिरतात. त्यामुळे पेशी मऊ होऊन सडतात व कांद्याला एक प्रकारचा घाण वास येतो. महाराष्ट्रात खरीप हंगामात पाण्याचा निचरा न होणार्या जमिनीत नुकसान जास्त होते.

उपाय : तृणधान्यासोबत पिकाची फेरपालट करावी. खरीपात निचरा होणार्या हलक्या जमिनीत कांद्याची लागवड करावी.

जांभळा करपा : हा रोग अल्टरनेरिया पोराय या बुरशीमुळे होतो. हा रोग पिकांच्या कोणत्याही अवस्थेत येतो. पानावर सुरूवातीस खोलगट, लांबट, पांढुरके चट्टे पडतात. चट्ट्यांचा मधला भाग सुरूवातीस जांभळट व नंतर काळपट होतो, असे अनेक चट्टे पाने किंवा फुलांच्या दांड्यावर पडतात. अनेक चट्टे एकमेकांत मिसळून पाने करपतात, वाळतात. झाडाच्या माना मऊ पडतात. जांभळा करप्याचे प्रमाण खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात असते. रांगडा हंगामातील कांद्यावरही या रोगाचा प्रादुर्भाव होतो.

उपाय : मॅन्कोझेब (०.३ टक्के) ३० ग्रॅम किंवा कार्बेन्डॅझिम (०.२ टक्के) किंवा क्लोरोथॅलोनिल (०.२ टक्के) २० ग्रॅम औषध १० लिटर पाण्यात मिसळून दर १२ ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. थायरमसोबत बिजप्रक्रिया करावी. फवारणीसोबत चिकटद्रव्याचा वापर करावा. नत्रयुक्त खतांचा जास्त आणि उशीरा वापर करू नये. पिकांची फेरपालट करावी.

करपा : अल्टरनेरिया पोराई या नावाच्यामुळे होतो. या रोगाचा प्रादुर्भाव आर्द्र हवामान, तापमान २८ ते ३० अंश सें. आणि आर्द्रता ८० ते ९० टक्के असल्यास मोठ्या प्रमाणात होते. एकसारखा पाऊस किंवा ढगाळ वातावरण असल्यास रोगाचा प्रसार झपाट्याने होतो. हा रोग कांद्याची पात तसेच फुलांच्या दांड्यांवर येतो. या रोगाची तीव्रता खरीप हंगामात अधिक राहते. दोन ते तीन वर्षासाठी फेरपालट करावी.

उपाय : मॅन्कोझेब बुरशीनाशक अडीच ग्रॅम प्रतिलिटर किंवा कवच किंवा रोवराल दोन ग्रॅम प्रतिलिटर याप्रमाणे द्रावण तयार करून १० दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारणी करावी. द्रावणात चिकट पदार्थ जसे इंडट्रान किंवा सॅडोविट सहा मिली प्रति १० लिटर या प्रमाणात अवश्य मिसळावे, ज्यामुळे रोगांपासून अधिक चांगले नियंत्रण मिळेल.

तपकिरी करपा : हा रोग स्टेम्फिलियम व्हॅसिकॅरियम या नावाच्या बुरशीमुळे होतो. या रोगाचा प्रादुर्भाव कांदा पिकावर तसेच बियाण्याच्या पिकावर मोठ्या प्रमाणात होतो. पिवळसर, तपकिरी रंगाचे लांबट चट्टे पानाच्या बाहेरील भागावर दिसू लागतात. चट्ट्यांचा आकार वाढत जाऊन पाने सुकू लागतात. फुलांच्या दांड्यावर हा रोग आल्यास फुलांचे दांडे मऊ होतात व त्या जागी वाकून मोडतात. या रोगाचा प्रसार प्रामुख्याने रब्बी हंगामात होतो.

वित्तमंत्री बीडचे पालकमंत्री असुनही ८२ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांसाठी १ कोटी ३२ लाख रुपयांची मागणी जिल्हा प्रशासनाने करून दिड महिना झाला अद्याप निधी नाही

अजितदादा पालकमंत्री होऊन उपयोग काय? शेतकरी आत्महत्या प्रकरणी सरकार असंवेदनशील; ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात १जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत २०५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे. त्यापैकी १७३ शेतकऱ्यांची प्रकरणे पात्र तर २९ प्रकरणे अपात्र ठरवण्यात आली आहेत. चौकशीसाठी ०३ प्रकरणे प्रलंबित आहेत. १०८ शेतकरी कुटुंबाला मदत देण्यात आली असून ६३ जणांना मिळणे बाकी आहे.जानेवारी ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ४४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्यापैकी १७ प्रकरणे पात्र व ०२ अपात्र ठरले आहेत. चौकशीसाठी २५ प्रकरणे प्रलंबित आहेत. मागच्या वर्षातील ६३ व चालू वर्षातील १७ अशा एकूण ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित आहेत. ८२ शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांसाठी जिल्हा प्रशासनाने १ कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीची मागणी करून दीड महिना उलटुनही अद्याप निधी देण्यात आला नाही. त्यामुळे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार हे पालकमंत्री असुनही निधी वेळेवर मिळत नसेल तर उपयोग काय?! असा सुर शेतकऱ्यांमधुन उमटत आहे.खते बियाणे,शेती मशागत, पेरणी,पिकांना पाणी देणे आदी बाबी खर्चिक झाल्या आहेत.वेळेवर मदत न मिळाल्याने शेतकरी कुटुंबीय हवालदिल झाले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना मदत द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना केली असून दि.१० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

२०२४ मधील शेतकरी आत्महत्या

जानेवारी एकूण प्रकरणे १८ पात्र प्रकरणे १४, मदत दिलेली प्रकरणे १४, फेब्रुवारी एकूण प्रकरणे १२ पात्र प्रकरणे १२ मदत दिलेली प्रकरणे १२, मार्च एकूण प्रकरणे १२ पात्र प्रकरणे १२ मध्ये दिलेली प्रकरणे १२ एप्रिल एकूण प्रकरणे १३ पात्र प्रकरणे १२ मदत दिलेली प्रकरणे १२, मे एकूण प्रकरणे १३ पात्र प्रकरणे १२ मदत दिलेली प्रकरणे १२, जून एकूण प्रकरणे २९ पात्र प्रकरणे २४ मदत दिलेली प्रकरणे २३, जुलै एकूण प्रकरणे १४ पात्र प्रकरणे ११ मदत दिलेली प्रकरणी ०९ , ऑगस्ट एकूण प्रकरणे १४ पात्र प्रकरणे १२ मदत दिलेली प्रकरणे ०५, सप्टेंबर एकूण प्रकरणे १५ पात्र प्रकरणे १४ मदत दिलेली प्रकरणे ०३ , ऑक्टोबर एकूण प्रकरणे ०९ पात्र प्रकरणे ०९ मदत दिलेली प्रकरणे ०४ , नोव्हेंबर एकूण प्रकरणे २२ पात्र प्रकरणे १९ मदत दिलेली प्रकरणे ०४, डिसेंबर एकूण प्रकरणे ३२ पात्र प्रकरणे २२ मदत दिलेली प्रकरणी ०० एकंदरीतच गेल्या वर्षभरात एकूण प्रकरणे २०५ पात्र प्रकरणे १७३ मदत दिलेली प्रकरणे १०८ आहेत.

तुटपुंजी मदत आणि तीसुद्धा वेळेवर नाही ; उच्च न्यायालयाची अवमानना

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना पंधरा दिवसाच्या आत मदत मिळणे बंधनकारक असल्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश असताना तातडीने मदत न मिळणे, वैद्यकीय अहवाल तातडीने सादर न करणे, प्रकरणे प्रलंबित ठेवल्या प्रकरणात संबंधित जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना शासनाकडून एक लाख रुपयांची मदत दिली जाते. त्यातील ३० हजार रुपये धनादेशाद्वारे उर्वरित ७० हजार रुपयांची पोस्टात एफडी केली जाते. हि मदत आधीच तुटपुंजी असून त्यातुनही शासनाकडून निधी देण्यास विलंब होत असल्याने एकंदरीतच सरकार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांप्रती असंवेदनशील असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.

संतश्रेष्ठ भगवानबाबांच्या कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा-अंजलीताई केंद्रे महाराज यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ भगवानबाबांनी आध्यात्मासह समाजसुधारणेचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा सुगंध सर्वत्र पसरला आहे. भगवानबाबाच्या कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे आवाहन स्वररत्न हभ.प. अंजलीताई केंद्रे महाराज यांनी केले. धन्य ते संसारी, या तुकाराम महाराज यांच्या अभंगावर, ह.भ.प. अंजलीताई महाराज बोलत होत्या.

मानवी जीवन जगताना, प्रत्येकाने आपले जीवन कृतार्थ करून घ्यावे, उद्धार करून घ्यावा. धन्यता करून घेतली, सहजतेने परमार्थ करून घेणारी माणसे देवतवाकडे पोहचतात. वारकरी संप्रदायाचे आदर्श ज्ञानेश्वर माऊली, निवृत्तीनाथ, सोपानकाका आणि मुक्ताई यांच्या जीवनातील चमत्कार आणि त्यांना झालेली त्रास दुःख हे विविध दृष्टांत देऊन देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले.

साधू, संताचे जीवन अभिमान विरहित असते. संत समाजाच्या उदाहरणे कार्य करतात. आजच्या कौटुंबिक, सामाजिक परिस्थिती विषयी बोलताना कीर्तनकार ह भ प अंजलीताई केंद्रे यांनी कौटुंबिक जीवनात दया असावी. माणसे हैवान झाली आहेत. प्रेम, सदाचाराने जीवन जगले पाहिजे. आपल्या वाणीतून त्रास होउ नये.माणुसकी ठेवा, बाबा आणि भाऊ यांच्या वाऱ्या हाती माप याप्रमाणे कीर्ती वाढली आहे. अधोगतीला की चागल्या मार्गाने जायचे? हे ठरवा. नाही मनामध्ये भाव, देव मला पाव, अशाने देव पावयाचा नाही, देव बाजारचा भाजीपाला नाही देव असणे भेटायचं नाही या भक्ती गीताद्वारे त्यांनी असो त्यांच्या हृदयाला हात घातला. जीवन धन्यतेच्या लायकीचे असावे

साधना जीवनात असावी, व्यसनामुळे जीवनात आनंद मिळत नाही. व्यसन जीवनाच्या नाश करते. संताने समाजावर उपकार करण्यासाठी कार्य केले. असे सांगून अंजलीताई महाराजांनी आई विषयी हृदयाला मांजर फोडणारे विवेचन केले. आई गेली तर जगातले सुख संपले. वृद्धाश्रमात आई, बाबांना ठेवू नका, ते आशीर्वाद देतील, आजच्याचकीर्तनाचे सार्थक होईल. असे सांगितले. यावेळी मृदंगाचार्य सचिन महाराज मुंडे आणि निलेश महाराज खेडकर यांनी मृदंगाची सत्संगसंगत केली. गायनाचार्य अक्षय महाराज गर्जे, देविदास महाराज बर्डे यांनी चाल गायन केले. कार्यक्रमास स्वामी शिवरुद्रानंद महाराज, माजी उपसभापती कुमार ढाकणे, ह.भ.प. गीताराम महाराज, अशोक ढाकणे सर, कल्याण उगलमुगले, शिवाजी महाराज ढाकणे, परमेश्वर ढाकणे, अशोक ढाकणे, बबन ढाकणे, भारत ढाकणे, भागवत ढाकणे आदींची उपस्थिती होती.

जगात भारताचे संविधान महान आहे -डॉ.उमाकांत वानखेडे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येतील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधान गौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली या कार्यक्रमाचा भाग म्हणून आज भारतीय लोकशाही आणि संविधान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर उमाकांत वानखेडे तर लोकप्रशासन विभागाचे प्रमोद मांजरे त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे न्याय समन्वयक प्राध्यापक विनोद सर राज्यशास्त्र विभागाचे डॉक्टर अशोक देवगुडे सर व्यासपीठावर उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉक्टर अशोक देवगुडे यांनी केले आणि उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून संविधानाचे अमृत महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यानंतर प्राध्यापक डॉक्टर उमाकांत वानखेडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना भारतीय संविधान हे भारतीयाची जीवनपद्धत असून ध्येय सामाजिक राजकीय धार्मिक परिवर्तनाचे साधन आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून महान अशा संविधानाची निर्मिती केलेली आहे हे संविधान आज आपल्या जीवनाचे जीवन जगण्याचे साधन झाले आहे आपले संविधान या जगातील महान संविधान असून कोणत्याही प्रश्नांची सोडवणूक करण्याची ताकद ही संविधानात असल्याचे मनोगत प्राध्यापक वानखेडे यांनी व्यक्त केले तर प्राध्यापक प्रमोद मांजरे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संविधान ही जीवन जगण्याची पद्धत आहे ते परिवर्तनाचे साधन आहे आपल्याला दिलेली अधिकार आणि हक्क हे आपण त्याचा उपयोग आपल्या जीवनात केला पाहिजे असे मनोगत व्यक्त केले तर प्राध्यापक विनोद किर्दक त्यांनी आपले आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी संविधान ही आपल्यासाठी कसे गरजेचे आहे या दृष्टिकोनातून मांडणी केली अध्यक्ष समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनी केला त्यांनी संविधान या आपल्यासाठी जीवनदायीनी आहे विद्यार्थ्यांनी राज्यघटनेचा अभ्यास करून अभ्यास करून राज्यघटनेची माहिती ठेवली पाहिजे आपल्या प्रत्येक गरजा भागवण्याचे संविधानिक साधन आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी संविधानाचा अभ्यास करून स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचे आव्हान घाडगे सर यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर लोखंडी बीबी यांनी केले तर आभार प्राध्यापक डॉक्टर रामकृष्ण प्रधान यांनी मांडले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सामाजिक सलोखा कायम टिकवण्याची गरज सद्भावना यात्रेत सहभागी व्हा -एमडी खमरोद्दीन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात काही दिवसापासून जाती जातीमध्ये द्वेष पसरवला जात आहे सामाजिक सलोखा बिघडत आहे जाती धर्माच्या नावावर द्वेष पसरवून स्वार्थ साधण्याच्या या काळात सामाजिक एकता कायम टिकवण्याची नितात गरज जातीय सलोखा टिकविण्यासाठी काँग्रेस पक्षाने सद भावना यात्रा आयोजित केली असून सर्वांनी या सद्भाभावना यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभाग बीड शहर अध्यक्ष एमडी खमरोद्दीन यांनी केले आहे खमरोद्दीन यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की आज शेतकरी कष्टकरी शिक्षित युवकसह सामान्य जनता आर्थिक टंचाई महंगाई बेरोजगारी या समस्यांनी त्रस्त आहे सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे नागरिकांना

समोरील संकटे वाढत आहेत अशा मुद्द्यावरून जनतेचे लक्ष इतरत्र वळण्यासाठी जाती जाती मध्ये द्वेष वाढवून सत्तेचा स्वार्थ साधला जात आहे ही मोठी शोकातील असून अशा वेळी देशात सामाजिक सलोखा कायम टिकविण्याचे गरजेचे असून सामाजिक एकता कायम राखण्याकरिता आपण सर्वांनी या सद्भावना यात्रेत सहभागी होण्याची आवश्यकता असल्याची गवाई खमरोद्दीन यांनी केली बीड जिल्हा ही संताची पवन भूमी आहे या पवन भूमीत विविध जाती धर्माचे लोक एकोप्याने राहतात आहेत ही संताची शिकवण आपल्या पिढीने जपली पाहिजे त्यामुळेच सामाजिक बंधुभाव वाढतो जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडत चालला असून तो पूर्वत करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने मस्साजोग ते बीड असे सद्भावना, यात्रेचे आयोजन केले असून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ खासदार रजनीताई पाटील माजी मंत्री अशोक पाटील माजी आमदार सिराजुद्दीन देशमुख युवा नेते फरीद भैया देशमुख जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत ही सदभावना यात्रा निघणार असून या सद्भवना यात्रेत सहभागी होऊन सामाजिक सलोखा जपण्यासाठी सहभागी होण्याचे आव्हान शहराध्यक्ष एमडी खमरोद्दीन यांनी केले आहे.

बोराडे यांचेवर अमानुष अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशी द्या

सकल धनगर समाज कळंब यांची मागणी

कळंब । प्रतिनिधी

अन्वा ता भोकरदन जि जालना येथील कैलास गोविंद बोराडे (३६ वर्ष) यांचा कांही नराधमांनी अमानुषपणे छळ करून गंभीर जखमी केले आहे. या प्रकरणी संबंधितांना तात्काळ अटक करून कठोर शासन करावे अशी मागणी कळंब तालुक्यातील सकल धनगर समाज बांधवांकडून करण्यात येत आहे.

कैलास बोराडे यांना १ मार्च रोजी अन्वा ता भोकरदन येथील समाजकंटकांनी चुलीवर गरम केलेल्या लाल सळईने शरीरावर विविध ठिकाणी १६ डाग देऊन गंभीररीत्या जखमी केले . कांही जखमा शरीराच्या प्रायव्हेट पार्टवर देखील आहेत. या पाशवी नराधमांना तात्काळ अटक करून मकोका लावावा व कठोरारात कठोर फाशी ची शिक्षा द्यावी अशी मागणी कळंब तालुका सकल धनगर समाज बांधवांकडून करण्यात येत आहे. अशा आशयाचे निवेदन कळंब तहसीलदार महोदयांना देण्यात आले. तहसीलदारांच्या वतीने श्री गोपाळ भराडिया नायब तहसीलदार यांनी निवेदन स्विकारून वरिष्ठांना कळविण्याचे आश्वासन देण्यात आले. निवेदनावर अजित गायके, पांडुरंग लोकरे,डॉ रामकृष्ण लोंढे,संतोष घाटूळे,झेलम शिंपले,श्रीकांत मैदांड, सुभाष मैंदाड,नेताजी हारकर.

उमाई पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

उमापुर । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील उमापूर येथील सुमन प्रतिष्ठान संचलित उमाई पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन (दि. २८ फेब्रुवारी शुक्रवार रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन गावचे सरपंच संभाजी आहेर यांनी केले. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विनोद खरात सर, बळीराम गंगाधर सर, महेश चेके सर, समीर भाई ,ज्येष्ठ नागरिक जगन्नाथ गायकवाड, मुबारक भाई ,दिगंबर कणसे आदी मान्यवर उपस्थित होते. उमापूर परिसर हा पूर्ण ग्रामीण आहे स्व. भास्करराव बने सरांनी हे स्कूल सुरू करून गरीब होतकरू विद्यार्थ्यांना एक शैक्षणिक दालन उभे केले आहे.असे आहेर यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात सांगितले. तसेच यावेळी खरात सर यांनी ही बने दांम्पत्य या शाळेसाठी सतत कार्यशील असते असे सांगून, पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रस्ताविक भाषणामध्ये उपप्राचार्य रेखा बने मॅडम यांनी वर्षभरातील शाळेतील कामकाजाचा आढावा घेऊन उपक्रमामध्ये गोपाळकाला , गणेशोत्सव ,क्रीडा महोत्सव, तिरंगा दिन, रक्षाबंधन, परिसर सहली, सहल, विविध परीक्षा, सांस्कृतिक कला, विज्ञान व कार्यानुभव आदी उपक्रम वर्षभरात घेतले गेले हे सांगितले. स्नेहसंमेलनामध्ये मुलांनी देशभक्तीपर गीते, नाटके बडबड गीते, कॉमेडी गीते, लोकगीते व धार्मिक गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुडके मॅडम, सांगळे मॅडम,राऊत मॅडम यांनी परिश्रम घेतले. उपस्थित सर्वांचे आभार प्राचार्य सतीश बने सर यांनी मानले.हा कार्यक्रम पाहण्यासाठी सर्व पालक व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

ऑनेस्टी पब्लिक स्कूलचा बाल महोत्सव माजलगावसाठी मेजवानी -डॉ. संजय रोडगे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल चे १३ वे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपाध्यक्ष डॉ. सचिन डक होते. प्रमुख पाहुणे डॉ. रमेश गटकळ, निवेदक नंदकुमार कुलकर्णी उपस्थित होते.

उद्घाटक उद्योजक डॉ. संजय रोडगे यांनी पालकांना, विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासाबरोबर सांस्कृतिक सुप्त गुणांना व्यक्त केले पाहिजे. शाळेचे सर्व वार्षिक नियोजन व इतर प्रात्यक्षिके पाहून मी समाधानी झालो आणि खर्या अर्थाने सर्व स्टाफ मेहेनत घेत आहे. तसेच शाळा व्यवस्थापनाणे छोट्या - छोट्या घटकाचा विचार करून प्रोत्साहन दिले आहे हे विशेष वाटले.

शाळेचा वार्षिक अहवाल प्रिन्सिपल अमृता तोर यांनी मांडला. प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक डॉ. विठ्ठल वाघ यांनी आतापर्यंत केलेले कार्य व पुढील नियोजन याची थोडक्यात माहिती दिली.यावेळी डॉ. रमेश गटकळ म्हणाले कि, ऑनेस्टी पब्लिक स्कूलच्या नियोजनाचा आणि लहान विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी देण्याचे कार्य गेली १२ वर्षापासुन करत आहात. अध्यक्षीय समारोप डॉ. सचिन डक यांनी केला.सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट विद्यार्थी, उत्कृष्ट हजेरीपट असणार्या विद्यार्थ्यांना सन्मानीत करण्यात आले. तसेच उत्कृष्ट शिक्षक म्हणुन वर्षा दीक्षित यांना सन्मानीत करण्यात आले. लहान विद्यार्थ्यांनी रसिकांना आपल्या अभिनयातून मंत्रमुग्ध केले.

नवे जुने चित्रपट गाण्यावर ठेका धरत रसिकांच्या चेहर्यावर हास्य कायम ठेवले. यावेळी गुरू शिष्य परंपरा, मोबाईल थीम, शेतकर्यांची थीम,देशभक्ती वर आधारित गीते, मराठी लावणी , हिरकणी थीम अशा अनेक समाज संदेशपर आधारित सादरीकरनाणे रसिकांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचालन निवेदक नंदकुमार कुलकर्णी, माजी विद्यार्थी जान्हवी वाघ, मानसी वाघ यांनी केले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभागा च्या पल्लवी गायकवाड, प्रभा हरकळ, अंकिता भुतडा, इंचार्ज वनिता राठोड, सुप्रिया गरुड, जयश्री जाधव, अश्विनी घुबडे, वर्षा दीक्षित, श्रुती कुलकर्णी, निकिता गिलबिले, राजश्री महामुनी, गायत्री देशमुख, स्वाती रुद्रवार ,शिल्पा सोळंके, दीपा शिंदे, अश्विता टाक, विशाखा कोमटवार, सुशीला जोशी, अंजली ढेरे, श्रीनिवास तोर,पिराजी मुसळे, विजय साळवे, राजू शेख, ज्योती खोसरे, लता गाडेकर यांनी मेहेनत घेतली. कार्यक्रम स्थळी शाळेचे संस्थापक, संचालक डॉ विठ्ठल वाघ ,ॲड महेंद्र इंदाणी, राहुल देशमुख,सौ.सत्यभामा वाघ यांची उपस्थिती होती.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजय संपादन करण्यासाठी शिवसैनिक सज्ज

संपर्कप्रमुख परशुराम जाधव जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड । प्रतिनिधी

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व मराठवाडा संपर्क नेते सुनिल प्रभू साहेब, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुळकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली बीड विधानसभा व गेवराई विधानसभा क्षेत्रातील सर्व पदाधिकारी व शिवसैनिक , युवासेना, महिला आघाडी यांची आढावा बैठक बीड येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय सिद्धिविनायक कॉमलेकसय येथे व गेवराई येथील माजी मंत्री बदामराव पंडित यांच्या संपर्क कार्यालय येथे संपन्न झाली यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुराम जाधव व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी सांगितले की , मातोश्रीशी अनेकांनी गद्दारी करुन आपला पक्ष व चिन्ह चोरले आहे पण अजुनही निष्ठावंत व बिगर लाभार्थी शिवसैनिक ठामपणे मातोश्रीशी इमान राखून आहे या निष्ठावंत

शिवसैनिकांच्या जीवावरच पुन्हा एकदा गतवैभव प्राप्त करायचे आहे, पुन्हा नव्याने पक्षबांधणी करायची आहे, विधानसभा निवडणुकीत खोट्या योजनांची अमिषे दाखवून व मतपेटीत घोळ करून हि मंडळी सत्तेवर बसली आहे पण आता हे सर्व लोकांना कळले आहे, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला पुर्ण ताकदीने सामोरे जायचे आहे व हया निवडणुकीत विजय संपादन करायचा आहे, त्यासाठी सर्वांनी कामाला लागावे असे आवाहन केले.बीड येथील बैठकीस तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका मीराताई नवले, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके ,युवासेनेचे बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, उपतालुकाप्रमुख अशोक सगळे, उपतालुकाप्रमुख दादासाहेब सोनवणे, उपतालुकाप्रमुख नितीन नवले,तालुका संघटक राजेश काकडे, युवानेते मुकेश घुमरे,सखाराम मोहिते, उपसरपंच बाळासाहेब कुटे , उपसरपंच बाळासाहेब वरेकर , प्रविण पवार,ज्ञानेश्वर सिंघन, मुन्ना जाधव,शाखाप्रमुख राजेंद्र भोसले,तर गेवराई येथील बैठकीस, उपजिल्हाप्रमुख महादेव औटी ,बबलू खराडे , तालुकाप्रमुख अजय दाभाडे, शहरप्रमुख साद चाऊस,गेवराई तालुका युवा अधिकारी गोविंद दाभाडे,शेख शहजाद , राजेंद्र रोमन, राजाभाऊ टकले , उज्वल सुतार यांच्यासह दोन्ही ऊत विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व शिवसैनिक , महिला आघाडी, युवा सेना मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडवणीत प्लायवुड, कलरच्या दुकानाला भिषण आग

कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले; सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास लागली आग

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील चिंचवण रोडवर असलेल्या पंतगे ट्रेडर्सला आज सकाळी ७ वा.सुमारास अचानक भिषण आग लागली असून दुपारी १२.३० वाजेपर्यंत आग पूर्णपणे आटोक्यात आलेली नाही. सदरील आग विझविण्यासाठी अग्निशामकच्या पाच गाड्याना पाचारण करण्यात आले होते. तर या आगीत कोट्यावधी रुपायाचे नुकसान झाले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. तर वडवणी न.प. तील स्वतंत्र अग्निशामकची गाडी असून देखील त्या गाडीला जवळपास अडीच तास उशीर लागला हे विशेष असल्याने आग लागली होती, लोक पाहत होते. तर वडवणी नगरपंचायतीचा ढिसाळ कारभाराचे नुमना पाहिला...असा शब्दात प्रथमदर्शी लोक संताप व्यक्त करत आहेत.

याबाबत आधिक माहिती अशी कि, शहारातील चिंचवण रोडवरील गेल्या अनेक वर्षापासून विशाल विलास पंतगे यांचे बांधकाम साहित्याचे पंतगे ट्रेडर्स म्हणून नांमाकित दालन आहे. या दुकानाला आज सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास भिषण आग लागली आहे. आग कशामुळे लागली आहे. हे कारण समजू शकले नसले तरी हि आगीची तिव्रता खूप मोठी मोठी होती. या दुकानाचे बांधकाम काँलमचे असून देखील त्याला आगीने तडे गेले आहेत. तर दुकानातील बांधकाम व्यवसायाचे सर्वच साहित्य जळून खाक झाले असल्याचे दिसून येत आहे. सकाळी आग लागली परंतु वडवणी न.प. तीला स्वतंत्र अग्निशामक गाडी आसताना देखील

अग्निशामकची गाडी ९.३२ मि. घटनास्थळी, दुपारी १२.३० वाजता आग पूर्णपणे आटोक्यात

ती गाडी घटना घडल्यापासून ९.३२ मिनिटाने म्हणजे अडीच तासने गाडी घटनास्थळी पोहचली. तेव्हा माजलगांव, बीड आणि धारुर याठिकाणाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. तर हि आग पाच अग्निशामक गाड्याने आग विझविण्यासाठी शर्यतीचे प्रयत्न केले जात आहेत. तर दुपारी १२.३० मि. पर्यत आग आटोक्यात आली होती, परंतु पुर्णपणे बंद झालेली नव्हती. सदरील घटनास्थळीची आग पाहण्यासाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. तर पंतगे ट्रेडर्सला आग ७ वा. लागली होती. तर लोक पाहत राहिले परंतु या घटनने वडवणी नगरपंचायतीचा कारभाराचा नुमना आज हजारो घटनास्थळी असर्णाऱ्या लोकांनी पाहितला हा विशेष तर चार अग्निशामक गाड्यावर प्रशिक्षर्थी कर्मचारी देखील दिसून आले नाहीत. यामुळे देखील आग आटोक्यात आली नसल्याचे बोलले जात आहे. तर घटनास्थळी पोलीस प्रशासन बघर्णाऱ्यांची गर्दी दिसून आली होती. तर दुपार पर्यंत आग सुरु असल्याचे दिसून आले आहे.

चालकाने फोन उचलला नाही – सिओ

सदरील घटनेतील आग ज्वालामुखी प्रमाणे होती. गाडी उपलब्ध आणि तत्पर होती. परंतु सकाळी या गाडी चालकाने फोन न घेतल्यामुळे अग्निशामक गाड्या या माजलगांव आणि धारुर येथून बोलविण्यात आल्या आहेत. मी यामध्ये स्वता फोन केला आहे. अशी प्रतिक्रिया वडवणी न.प.मुख्यधिकारी पोपट निगळ यांनी दिली आहे.

चर्चाना उधान

सदरील घटनास्थळी वडवणी येथील अग्निशामक गाडी हि उशीरा आली तेव्हा घटनास्थळीच त्या गाडीत डिसेल भरण्यात आले आहे. असे प्रथमदर्शी असर्णाऱ्या लोकामधून सांगण्यात आले आहे. तर याबाबत सिओ पोपट निगळ यांना विचारले आसता गाडीत डिसेल कमी असेल म्हणून भरले असेल अशी सांगत गाडी कुठे जाते हे मला माहित नसते. अशी प्रतिक्रिया देत माहिती दिली आहे.

शिंपेटाकळीचे ग्रामसेवक व्हि. जी. पवार यांना ११ हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील शिंपेटाकळी ग्रामपंचायतचे लाचखोर ग्रामसेवक श्री पवार यांना लाचलुचपत पथकाने दि ०५ मार्च बुधवार रोजी दुपारी ४:०० वाजण्याच्या सुमारास माजलगाव पंचायत समिती कार्यालयात रंगेहाथ पकडले.

शिंपे टाकळी ग्रामपंचायत अंतर्गत पंतप्रधान आवास घरकुल योजनेचे ११४ घरकुल मंजूर झाले आहेत परंतु सदर ग्रामविकास अधिकारी प्रती घरकुल १०-१५ हजार रुपये मागत असल्याचे वारंवार निदर्शनास आले होते माझे पंचायत समिती काही काहीही करू शकत नाही व खुशाल तक्रार करा असे देखील ते वारंवार लाभार्थ्यांना धमकावत होते सदर प्रकरणात घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी पैशाची मागणी करण्यात आली होती तक्रारदार परीस्थिती मुळे पैसे देवू शकत नव्हते त्यामुळे त्यांनी लाच लुचप्रतिबंध विभागाशी संपर्क साधून या संदर्भातली तक्रार केली होती दि ०५ मार्च बुधवारी सायंकाळी ४:०० वाजण्याच्या सुमारास ग्रामसेवक पवार यांना माजलगाव पंचायत समिती कार्यालयातुन ताब्यात घेण्यात आले.

शिंपेटाकळी गावातील अनेक नागरीकांनी पवार यांची वारंवार तक्रार करूनही त्यावर कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही त्यामुळे पवार यांना पाठीशी पारटकर तर घालत नाहीत ना असा सवाल नागरीक करत आहेत.

शिंपेटाकळीचा विकास पवार यांनीच थांबवला

शिंपेटाकळी ग्रामपंचायत अंतर्गत भ्रष्टाचार करता येतील अशाच कामांचा ठराव घेऊन मनमानी पद्धतीने पवार यांनी केले आहेत त्यामुळे गावात इतर निधी देखील मिळत नाही परीणामी गावचा विकास खुंटला आहे मोठ्या प्रमाणात महसूल गोळा करून तो बुडवण्याच काम पवार यांनी केले असल्याचे आरोप गावकऱ्यांनी केले आहेत.

आ.प्रकाश सोळंकेंना मंत्रीपद द्या

लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. राज पाटील यांनी केली अजित दादांकडे मागणी

वडवणी । प्रतिनिधी

लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांचा वारसा खंबीरपणे चालवणारे माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार एक ज्येष्ठ व्यक्तिमत्व प्रकाश दादा सोळंके यांना कॅबिनेट मंत्री पद देऊन त्यांच्या अनुभवाचा फायदा बीड जिल्ह्यासाठी घ्यावा मराठवाड्यात ते एक ज्येष्ठ आणि चारित्रसंपन्न नेते आहेत. समाजामध्ये त्यांची ख्याती आहे. अशा नेत्याला जर बीड जिल्ह्यात मंत्रिपद दिले तर या जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था आणि समन्वय टिकून राहील मराठवाड्यात देखील पक्षाला त्यांचा फायदा होईल यासाठी प्रकाश दादांना मंत्रिपदाची संधी द्यावी अशी मागणी सरपंच परिषद महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केले आहे.

शेतकऱ्यांना देखील होणार फायदा

प्रकाश दादा सोळंके यांनी उजाड माळरानावर कारखाना निर्माण करून या भागातील शेतकऱ्यांना नवसंजीवनी दिलेली आहे. कारखान्याच्या माध्यमातून उसाला चांगला भाव देऊन शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्यामध्ये त्यांनी भूमिका निभावलेली आहे. ठिकठिकाणी पाणी प्रकल्प, वीज प्रकल्प उभारून शेती उत्पन्न वाढीसाठी त्यांनी मोठी कामगिरी केलेली आहे. शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांना मिळाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. त्यांना मंत्रिपद मिळाले तर मराठवाड्यासह बीड जिल्ह्यातील शेतकरी शेतमजुरांना देखील त्यांच्या अनुभवाचा मोठा फायदा होऊ शकतो.

याबाबत राज पाटील यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री सुंदररावजी सोळंके साहेबांचा खंबीर वारसा लाभलेले माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय नेते प्रकाश दादा सोळंके यांनी आपल्या वडिलांच्या पावलावर ◀◀ पान ३ वर

मोटारसायकल अपघातात माजलगावच्या व्यापाऱ्याचा मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील कापड व्यापारी वैभव वसंतराव आनंदगावकर वय ४५ वर्ष यांचा बीड जवळील जरूड फाट्यावर झालेल्या मोटारसायकल अपघातात जागीच मृत्यू झाला.ही घटना दि ०४ मार्च मंगळवार रोजी सायंकाळी घडली.

माजलगाव शहरात जुन्या बसस्थानकातील ठक्कर बाजार कॉम्प्लेक्समध्ये वैभव आनंदगावकर या तरुणाचे बजरंग रेडिमेड व साडी सेंटर हे कापड दुकान आहे,दि ०४ मार्च मंगळवार रोजी ते आपल्या मोटारसायकलवर दुकानाच्या खरेदीसाठी बीड येथे दुपारी गेले होते. तेथील खरेदीचे काम आटोपून सायंकाळच्या सुमारास माजलगावकडे परत निघाले असता बीड-परळी महामार्गाचे रस्ता बांधण्याचे काम सुरू आहे. या रस्त्यावर जरूड फाट्याजवळ त्यांची मोटारसायकल आली असता,रस्त्याच्या कामाचा अंदाज न आल्याने मोटारसायकलचा खड्यात जोरदार अपघात होऊन त्यांच्या डोक्यास जबर मार लागला, रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनातील लोकांनी वैभव यांस बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले.मात्र, त्यांच्या डोक्यास जबर मार असल्याने त्यांचा मृत्यू झाला.दि ०५ मार्च बुधवार रोजी त्यांच्यावर माजलगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील,पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या या अपघाती निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून, ठक्कर बाजारातील संपूर्ण व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

युसुफवडगाव ठाण्यातील सय्यद अमजद यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

युसूफवडगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सय्यद अमजद सय्यद मीर यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकमदी पदोन्नती झाली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.

सय्यद अमजद यांच्याकडे पोलीस स्टेशन अंतर्गत होळ बीटची जबाबदारी आहे. त्यांनी आतापर्यंत पोलीस खात्यात उत्तम सेवा बजावली आहे. जिल्हा पोलीस दलातील ११ पोलीस हवलदारांना सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात आली आहे. यामध्ये सय्यद यांचा समावेश आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी दि.४ मार्च रोजी पदोन्नतीचे आदेश काढले. सय्यद यांना पदोन्नती मिळाल्याबद्दल युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

युसूफवडगांव विद्यालयाचे इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युसुफवडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयने नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन,नवी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल मॅथ ओलिंपियाड स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले असून,विद्यालयाच्या एकूण पाच विद्यार्थ्यांनी यामध्ये यश प्राप्त करून सुवर्णपदके पटकावले आहेत.

यामध्ये इयत्ता सातवी मधून प्रथम कु.पाटील श्रेया मन्मथ,इयत्ता नववी मधून प्रथम कु.थळकरी सिद्धी सचिन,इयत्ता दहावी मधून प्रथम कु.चोपने मोहिनी श्रीमंत,द्वितीय कु.थळकरी सिद्धी चंद्रकांत,तर तृतीय चि.रोडगे हर्षवर्धन सोमनाथ यांनी क्रमांक पटकाविले असून,या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत गोल्ड मेडल तसेच अप्रिसिएशन प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत.नुकताच या परीक्षेचा निकाल लागला असून तसे नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत विद्यालयास कळविण्यात आलेले आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था सचिव दीपक दादा घुमरे,संस्था अध्यक्ष सुकाळे यु.बी,प्राचार्य भोसले ए.यु,उपप्राचार्य श्रीमती जाधवर एम.एस,पर्यवेक्षक खरबड आर.बी,उच्च माध्यमिक विभाग प्रमुख चव्हाण.एन .एन,सर्व शिक्षकवृंद पालक व नागरिक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

स्व.देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशी देण्याच्या मागणीसाठी माजलगावमध्ये कँडलमार्च

माजलगाव । प्रतिनिधी

मस्साजोग येथील दिवंगत सरपंच संतोष अण्णा देशमुख यांच्या मारेकऱ्यांना लवकरात लवकर जलदगती न्यायालयात फाशीची शिक्षा व्हावी व त्यांच्या परिवारास न्याय मिळावा यासाठी माजलगाव शहरात दि ०५ मार्च बुधवार रोजी सायंकाळी ६:०० वाजता हनुमान चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक कॅन्डल मार्च काढण्यात आला.या कॉंडल मार्चमध्ये काळ्या फिती लाऊन शहरातील नागरिकांची महीलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

'सद्भावना' पदयात्रेमध्ये सहभागी होणार- नितीन जायभाये

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय इंदिरा काँग्रेस पक्षाच्या व काही सामाजिक संघटना, इतर काही पक्ष या सर्वांच्या वतीने पुढाकार घेऊन मसाजोग, केज येथून बीड पर्यंत काढण्यात येणाऱ्या सद्भावना पदयात्रेमध्ये काँग्रेस व इतर मित्र पक्षांचे पदाधिकारी, इंदिरा काँग्रेस पार्टीचे बीड शहराध्यक्ष मा. परवेजभाई कुरैशी, इंटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधनभाऊ जमाले तसेच त्यांचे सर्व सहकारी,आमच्या सर्व स्नेही बांधवांच्या आमंत्रणानंतर बीड शहर बचाव मंचाच्यावतीने अध्यक्ष/ निमंत्रक श्री. नितीनजी जायभाये हे सद्भावना पदयात्रेमध्ये सहभागी होणार आहेत, असे प्रस्तुत पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

काही राजकीय नेते पुढारी स्वतःच्या राजकीय महत्त्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करून, विषमतेचे विष समाजामध्ये पसरवून स्वतःच्या राजकीय पोळ्या भाजण्याचे डाव साधत आहेत. विषमतेचे विष पेरून गढूळ केल्या जात असलेल्या या सामाजिक परिस्थितीमध्ये सर्वसामान्य, निर्दोष माणूस भरडला जात आहे. जाती जातीमध्ये द्वोष निर्माण करण्यासाठी रोज नवीन-नवीन कटकारस्थाने व योजना आखल्या जात आहेत. सामाजिक भेदभाव, जाती जातीमध्ये वाढत चाललेली द्वोष भावना आणि त्यातूनच निर्माण होणारे दुष्परिणाम, अराजकता, कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न, गुन्हेगारी प्रवृत्तीला मिळणारे बळ या सर्व सामाजिक संतुलन नष्ट करणाऱ्या प्रवृत्तींपासून समाजाला व पुढच्या पिढीला वाचविणे गरजेचे आहे. सामाजिक विवेक व लोकांची सदसद्विवेक बुद्धी जागृत ठेवणे गरजेचे आहे. अशाच उदात्त भावनेतून समाजामध्ये न्याय भावना, न्यायव्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी सद्भावना जागृत राहणे गरजेचे आहे. सामाजिक सलोखा, ऐक्य वाढविण्यासाठी सद्भावना'' यात्रेचे आयोजन उपयुक्त ठरू शकते. तरी आयोजकांनी सदभावना यात्रेसारखा स्तुत्य उपक्रम हाती घेऊन दिलेल्या आमंत्रणाचे आभार मानून, सद्भावना यात्रेसारखा स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याबद्दलही सर्व आयोजकांचे आभार मानतो. आम्ही सर्व बीड शहर बचाव मंचाचे सर्वच पदाधिकारी तथा सर्व सदस्य आणि सद्भावनेचे खरे अनुयायी म्हणून मोठ्या संख्येने सद्भावना यात्रेमध्ये सहभागी होणार आहोत. तरी बीड शहरातील समस्त समाज बांधवांनी मोठ्या बहुसंख्येने सद्भावना यात्रेमध्ये सहभागी व्हावे असे विनम्र आवाहन बीड शहर बचाव मंचच्या वतीने करण्यात येत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

प्रवाशांच्या सतर्कतेमुळे कर्जत स्थानकात अपघात टळला; तातडीने करण्यात आले उपचार

कर्जत स्थानकात सहा मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता एक थरारक प्रसंग घडला, जिथे दोन प्रवाशांच्या सतर्कतेमुळे एका प्रवाशाचा जीव वाचला. पुणे-इंदूर एक्सप्रेस कर्जत स्थानकात पोहोचली असता सूर्यकांत गुप्ता नावाचे प्रवासी ट्रेनमधून उतरले. स्टेशनवर उतरल्यावर ते प्लॅटफॉर्मवर पुढे चालत गेले. त्याच वेळी ट्रेन कल्याणकडे निघत होती. या दरम्यान, एक प्रवासी गाडीत चढण्याचा प्रयत्न करत असताना संतुलन गमावून ट्रेन आणि प्लॅटफॉर्मच्या मध्ये सापडला. सुदैवाने, त्याने ट्रेनच्या दरवाज्यावरील हँडल घट्ट पकडले होते, त्यामुळे तो फरफटत पुढे गेला, पण पूर्णतः खाली पडला नाही.

यावेळी सूर्यकांत गुप्ता यांनी प्रसंगावधान दाखवत त्या प्रवाशाला तातडीने पकडले आणि वर खेचण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांची शक्ती अपुरी

पडू लागली. हे पाहून कर्जत स्थानकातील एका हॉकरने धाव घेतली आणि त्याने देखील दोन्ही हातांनी प्रवाशाला ओढून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. दोघांनी मिळून अथक प्रयत्न केल्यानंतर अखेर त्या प्रवाशाला सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळाले. मात्र, या अपघातात तो गंभीररीत्या जखमी झाला होता. त्याच्या पाठीवर मोठ्या प्रमाणावर खरचटले होते आणि तो मानसिकरित्या हादरला होता.

ही घटना घडल्यानंतर स्टेशनवरील कर्मचाऱ्यांनी तातडीने मदत केली आणि परिस्थिती हाताळण्यास पुढाकार घेतला. जखमी प्रवासी विजय शिरसाट, जो पुण्यातील काळेवाडीचा रहिवासी आहे, त्याला तत्काळ प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर नेण्यात आले. अपघातामुळे तो मोठ्या प्रमाणात घाबरलेला होता आणि शारीरिकदृष्ट्याही काही प्रमाणात अशक्त झाला होता. स्थानकातील आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांनी त्याच्यावर त्वरित प्राथमिक उपचार सुरू केले आणि त्याला आवश्यक ती वैद्यकीय मदत दिली. त्याच्या पाठीवर आणि हातावर खरचटल्याने वेदना जाणवत होत्या, मात्र सुदैवाने कोणतीही गंभीर दुखापत झाली नव्हती.

स्थानकातील कर्मचाऱ्यांनी त्याला धीर दिला आणि शांत करण्याचा प्रयत्न केला. प्रवाशांच्या सहकार्यामुळे मोठा अनर्थ टळला होता, याची जाणीव विजय शिरसाट यांना होत होती, त्यामुळे त्यांनीही सर्व मदत करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी त्याच्या पुढील प्रवासाची व्यवस्था केली आणि त्याला आवश्यक मलमपट्टी करून पुन्हा प्रवास करण्यासाठी तयार केले. स्टेशनवरील अधिकाऱ्यांनीही त्याच्या सुरक्षिततेची काळजी घेतली आणि पुढील मार्गदर्शन करून त्याच्यासाठी प्रवासाचे तिकीटही काढून दिले.

या संपूर्ण प्रसंगातून प्रवाशांच्या सतर्कतेचे आणि प्रसंगावधानाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. वेळेवर मदत मिळाल्याने एक अनमोल जीव वाचला. सार्वजनिक ठिकाणी प्रवास करताना प्रत्येकाने सावधानता बाळगणे आणि इतर प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः गाडीत चढताना किंवा उतरताना काळजी घेणे आवश्यक आहे, कारण थोडीशी बेफिकिरी मोठ्या अपघातास कारणीभूत ठरू शकते. यासोबतच, संकटाच्या क्षणी इतरांना मदत करण्याची तयारी असली पाहिजे, याचेही महत्त्व या घटनेतून अधोरेखित होते. कर्जत स्थानकातील कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता आणि प्रवाशांनी दाखवलेली माणुसकी निश्चितच कौतुकास्पद आहे.

पुणे ग्रामीण जिल्ह्यात २१ मार्चपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

पुणे । प्रतिनिधी

पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने ८ मार्च रोजी मध्यरात्री १२ वाजून ५ मिनिटांपासून ते २१ मार्च रात्री १२ वाजेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. हे आदेश महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७ (१) अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी दिले आहेत.

या आदेशानुसार कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे, दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे, शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाच्या चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

तसेच सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल, अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, अविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे, कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) विरुद्ध वर्तन करणे, कलम ३७ चे पोटकलम (३) अन्वये पाचपेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे तसेच पुणे ग्रामीण

पोलीस अधीक्षक यांच्या पूर्वपरवानगीशिवाय सभा घेणे किंवा मिरवणूक काढणे यासदेखील प्रतिबंध करण्यात आला आहे.

हा आदेश शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे व त्याबाबत परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

पुण्यात माल वाहतूक वाहनाची रिक्षाला धडक; चालकाचा मृत्यू



पुणे । प्रतिनिधी

मालवाहतूक करणाऱ्या भरधाव वाहनाच्या धडकेत रिक्षाचालकाचा मृत्यू झाल्याची घटना खडकवासला परिसरात घडली. याप्रकरणी पोलिसांनी चालकावर गुन्हा दाखल केला. दीपक छबू वाळुंजकर (वय ३५, रा. बहुली, ता. हवेली, जि. पुणे) असे मृत्यू झालेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. याप्रकरणी मालवाहू (पिकअप) वाहनाचा चालक धनराज पाटील (रा. किरकटवाडी, खडकवासला) याच्यावर गुन्हा दाखल केला. याबाबत सहायक निरीक्षक प्रसाद जोशी यांनी उत्तमनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, वाळुंजकर हे मंगळवारी (४ मार्च) सायंकाळी पाचच्या सुमारास खडकवासला परिसरातील कुडजे गावाकडे जाणाऱ्या रस्त्याने रिक्षातून निघाले होते. तेव्हा भरधाव वाहनाने त्यांच्या रिक्षाला धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता वाहनचालक पाटील पसार झाला. गंभीर जखमी झालेल्या रिक्षाचालक वाळुंजकर यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले होते. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. उपनिरीक्षक मुकेश कुरेवाड तपास करत आहेत.

धनंजय मुंडेना सहआरोपी करा; मावळमधून मराठा समाजाची मागणी

वडगाव मावळ : मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून आरोपींनी त्यांना केलेल्या अमानुष मारहाणीचे काही फोटो व्हायरल झाल्यानंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. या हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, माजी मंत्री धनंजय मुंडे यांना सहआरोपी करावे अशी मागणी मावळ तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.याबाबत तहसिलदार विक्रम देशमुख यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यभर हादरवून सोडलेल्या सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील काही गोष्टी काल प्रसार माध्यमातून पुढे आल्या. अतिशय अमानवी, क्रूर पद्धतीने

खून झालेल्या मत्साजोग गावचे आदर्श सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपी वाल्मिक कराड व त्याच्या साथीदारांनी हत्या करतानाचे व्हिडिओ आणि फोटो प्रसार माध्यमातून समोर आले. क्रौर्याची परिसीमा गाठत केलेले कृत्य भयाण असून संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपी वाल्मिक कराड व त्याच्या साथीदारांनी हत्या केली हे समोर आले असून देखील हत्येतील आरोपी वाल्मिक कराड माझ्या जवळचा माणूस असे म्हणत त्याला पाठीशी घालणाऱ्या माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून विधीमंडळ सदस्याचा राजीनामा दिला नाही, त्यामुळे जनतेची आणि अखंड मराठा समाजाची भावना तीव्र आहे.

त्याला पाठीशी घालणाऱ्या माजी मंत्री धनंजय मुंडे याचा तातडीने विधीमंडळ सदस्याचा राजीनामा घेण्यात यावा. त्याचे व त्याच्याशी संबंधित सर्वांचे उऊ्ठ तपासून आरोपींना मदत केल्याचे सिद्ध होत असल्यास त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करावी. मुख्य आरोपी वाल्मिक कराड सह धनंजय मुंडे पास सह आरोपी करण्यात यावे. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी मावळ तालुका मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक उपस्थित होते.

बीडमधील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली. डिसेंबर महिन्यामध्ये झालेल्या प्रकरणामुळे राज्याचे राजकारण तापले. संतोष देशमुख यांना मारहाण केल्याचे फोटो देखील आता समोर आले आहेत. या प्रकरणामध्ये प्रमुख आरोपी म्हणून वाल्मिक कराडचे नाव समोर आले आहे. वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांचे जवळचे संबंध असल्यामुळे त्यांच्यावर देखील आरोप करण्यात आले. मराठा नेते मनोज जरांगे पाटील, भाजप आमदार सुरेश धस आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. त्यानंतर धनंजय मुंडे यांच्यावर त्यांनी गंभीर स्वरुपाचे आरोप केले होते. अखेर धनंजय मुंडेंनी राजीनामा दिला आहे. मुंडेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राजीनामा दिला असून त्यावरील कार्यवाहीसाठी तो राज्यपालांकडे पाठवण्यात आला असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. मात्र फक्त राजीनामा नाहीतर धनंजय मुंडे यांना सहआरोपी करण्याची मागणी राज्यभरातून केली जात आहे.

स्वारगेट अत्याचार प्रकरणात समोर आली धक्कादायक माहिती; आरोपीने थेट पोलिसांच्या गणवेशात

पुणे: मागील आठवडयात पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर अत्याचार झाला होता. या अत्याचारानंतर संबंधित आरोपी हा घटनास्थळावरून पळून गेला होता. पोलिसांत तक्रार येताच गुन्हा दाखल करत पोलिसांची विविध पथके त्याच्या मागावर होती. अखेर त्याला पकडण्यात पोलिसांना यश आले. पुणे पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी दत्ता गाडेला अटक केली आहे. कोर्टने त्याला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. मात्र आता या आरोपीबाबत अनेक धक्कादायक माहिती समोर येत आहे.

कोठडीत असलेला आरोपी दत्तात्रय गडेची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे. त्यामध्ये अनेक बाबी समोर येत आहेत. चौकशीतून एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे.

स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे हा पोलिसांचा गणवेश परिधान करून बस स्थानकाच्या परिसरात वावरत असल्याची धक्कादायक माहिती तपासात समोर आली आहे.

आरोपीने पोलिसांचा गणवेश परिधान केल्याचा फोटो पोलिसांना मिळाला आहे. त्यामुळे या प्रकरणात नवीन माहिती समोर आली आहे. आरोपीच्या मोबाईलचे विश्लेषण पोलिसांनी केले आहे. पुण्यातील शिवाजीनगर , स्वारगेट, शिरूर, अहिल्यानगर, सोलापूर बसस्थानकात वावर असल्याचे समोर आले आहे. तसेच आशा प्रकारचे आणखी काही गुन्हे गाडेने केले असल्याचा संशय पोलिसांना आहे.

पुण्यातील स्वारगेट एसटी बसस्थानकावरील शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली. या अत्याचारानंतर संबंधित आरोपी हा घटनास्थळावरून पळून गेला होता. अखेर पुणे पोलिसांनी या नराधमला बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान या प्रकरणातील आरोपी दत्ता गाडेला कोर्टात हजर करण्यात आले. दरम्यान पुणे कोर्टाने आरोपी दत्ता गाडेला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

पुणे पोलिसांनी स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडेला शिवाजीनगर कोर्टात हजर केले. या प्रकरणी सुनावणी पार पडली. त्यावळेस कोर्टने आरोपीला कोठडी सुनावली आहे. आरोपी दत्ता गाडेने स्वारगेट बस स्थानकात एका २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार केला होता. त्यानंतर तो फरार झाला होता. अखेर अथक प्रयत्न करून पुणे पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या. आता पोलिस कोठडीत त्याची चौकशी केली जाईल. त्यातून आणखी कोणत्या गोष्टी समोर येतात हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

पाणीपट्टी आकारणी आता मीटरने?

पुणे । प्रतिनिधी

समान पाणी योजनेअंतर्गत शहरात पाणी पुरवठ्याचे झोन तयार करण्यात येत आहेत. त्यातील ७२ झोनचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण केले जाणार आहे. त्यासोबतच मीटर बसविण्याचे कामही पूर्ण केले जाणार असून त्यानंतर सोसायट्यांना मीटरद्वारे पाणीपट्टी आकारली जाणार असल्याचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले. शहरात सध्या केवळ व्यावसायिक मिळकतींना मीटरद्वारे पाणीपट्टी आकारली जात आहे. तर, इतर मिळकतींची पाणीपट्टी मिळकतकरात आकारली जात आहे.

आयुक्त म्हणाले की, समान पाणी योजनेसाठी केंद्र शासनाकडून जेएनएनयुआरएम आणि अमृत योजने अंतर्गत

निधी देण्यात आला आहे. त्यावेळी महापालिकेने योजना पूर्ण झाल्यानंतर मीटरद्वारे पाणीपट्टी आकारण्याच्या प्रस्तावास मुख्यसभेत मान्यता देण्यात आली आहे.

सध्या, या योजनेचे काम शेवटच्या टप्प्यात असून मार्च २०२६ पर्यंत ८८ मधील शहरातील ७९ टाक्यांचे काम पूर्ण होईल. तसेच २ लाख ८० हजार मीटर बसविण्यासह, पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या १४१ झोनचे कामही पूर्ण झाले असेल. त्यामुळे, प्रशासनाकडून त्यानंतर नियमानुसार, मीटरद्वारे पाणीपट्टी आकारली जाईल.

शहरात सध्या व्यावसायिक मीटरधारकांची सुमारे ६५० कोटींची पाणीपट्टी असून गेल्या वर्षभरात केवळ २३० कोटींची वसूली झाली आहे. त्यामुळे, यापुढे या वसुलीबाबत विशेष उपाययोजना केल्या जाणार असल्याचेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

पुणे पोलिसांची धडक कारवाई; मध्यवर्ती भागातून ११ लाखांचे मॅफेड्रॉन जप्त

पुणे: पुण्याच्या मध्यभागातून एका सराईताला पकडून पुणे पोलिसांनी नंतरच्या तपासातून एक आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट उघड केलेले असताना आता नाना पेठेतून मॅफेड्रॉन (एमडी) हा अमली पदार्थ विकण्यास आलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. छापेमारीत त्यांच्याकडून तब्बल ११ लाख ४० हजारांचे एमडीसह इतर असा १३ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अदीब बशीर शेख (२९, रा. नाना पेठ), यासीर हशीर सय्यद (३०, रा. कोंढवा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. शहरात ड्रग्ज सप्लायरचे जाळे मोठ्याप्रमाणात वाढले आहे. या सप्लायरवर पुणे पोलिसांची नजर असली तरी ग्राहकांपर्यंत ड्रग्ज पोहच होत असल्याचेही दिसून आलेले आहे. यापार्श्वभूमीवर अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथक हद्दीत गस्त व पेट्रोलिंग करत होते.

त्यादरम्यान नाना पेठ भागात दोघेजण थांबले असून त्यांच्याकडे एमडी असल्याची माहिती पथकाला मिळाली. यानूसार, पथकाने परिसरात सापळा रचला. तसेच, संशयित दोघे दिसताच पथकाने शेख, आणि सय्यद या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता एमडी आढळून आले. दोघांवर समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, अंमलदार आझाद पाटील, मयूर सुर्यवंशी, साहिल शेख यांच्यासह पथकाने ही कामगिरी केली.

सायबर चोरट्यांकडून महिलेची फसवणूक

ऑनलाईन टास्कच्या आमिषाने महिलेची सायबर चोरट्यांनी ३१ लाख ६५ हजार रुपांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर चोरट्यांवर विमानतळ पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ४१ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार विमाननगर भागात राहतात. गेल्या वर्षी जून महिन्यात महिलेला चोरट्यांनी मॅसेज पाठवून त्याद्वारे ऑनलाईन टास्कची माहिती दिली होती. घरबसल्या कामाची संधी असे आमिष दाखविले होते. सुरुवातीला चोरट्यांनी एक काम दिले. या कामाचे पैसेही दिले. त्यामुळे महिलेचा विश्वास बसला.

पुण्यातील 'ते' होर्डींग महापालिकेकडून जमिनदोस्त

पुणे: टिळक चौकातील संभाजी पोलिस चौकीच्या पाठीमागे उभारण्यात येत असलेल्या वादग्रस्त होर्डिंगला सांगाडा महापालिकेने मंगळवारी सकाळी पुन्हा पाडला. यासंदर्भात पत्रकारांनी सातत्याने पाठपुरावा करत प्रशासनाला कारवाई करण्यास भाग पाडले.महापालिकेच्या कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने दीड वर्षापूर्वी परवानग्या दिल्याने टिळक चौकातील संभाजी पोलिस चौकीच्या मागच्या बाजूला तीन होर्डिंग एकत्र करून एकच भले मोठे होर्डिंग उभारले होते.

यावर प्रसार माध्यमांनी प्रकाश टाकल्यानंतर तत्कालीन महापालिका आयुक्तांनी क्षेत्रीय कार्यालयातील तीन

कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते. त्यानंतर, होर्डिंग व्यावसायिकाने सलग होर्डिंग वेगवेगळे करून तीन होर्डिंग केले होते. कारवाई होण्याची शक्यता लक्षात घेऊन होर्डिंग मालकाने कारवाईस स्थगिती मिळविण्यासाठी महापालिका न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने कारवाईस स्थगिती देण्यास नकार दिल्यानंतर महापालिकेने फेब्रुवारी २०२४ मध्ये हे होर्डिंग पाडून टाकले होते. या घटनेस एक वर्षाचा कालावधी गेल्यानंतर, त्याच होर्डिंग मालकाकडून आता पुन्हा याच ठिकाणी होर्डिंग उभारणी करण्याचे काम सुरू आहे.

अधिकाऱ्यांना परतवून लावले

महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी शुक्रवारी परवानगीसंदर्भात चौकशी करण्यासाठी गेल्यानंतर त्यांना पोलिसांच्या समोर दमदाटी करून हुसकावून लावण्यात आल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांवर दादागिरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचा इशारा महापालिका अतिरिक्त आयुक्तांनी दिला होता. त्यानंतरही पूर्वी कापलेल्या लोखंडी फाउंडेशनवरच नट-बोल्ट च्या साहाय्याने सांगाडा उभारण्यात आला. या होर्डिंगला राजकीय व अधिकाऱ्यांचा वरदहस्त असल्याने या होर्डींगचा नेमका वरदहस्त कोणाचा असा सवाल उपस्थित झाला होता. या सर्व पार्श्वभूमीवर महापालिकेने अखेर मंगळवारी सकाळी या होर्डींगवर पुन्हा कारवाई करत ते जमिनदोस्त केले.